बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | गुरूवार,दि.२१नोव्हेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक१०५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



# भवितव्य मतपेटीत बंद!!

राज्यात ६५.११ टक्के मतदान | ३० वर्षांमधील सर्वाधिक प्रतिसाद | 'हा' जिल्हा सर्वात जागरुक

## मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात निरुत्साह

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत बुधवारी राज्यात सरासरी ६५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालं आहे. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मतांचा टक्का वाढल्याचं चित्र आहे. अखेरच्या काही तासांत मतदानाने जोर पकडल्याचे चित्र राज्याच्या काही भागांत पाहायला मिळालं. गावखेड्यांमधील मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मात्र, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या शहरी भागांमध्ये काहीसा निरुत्साह कायम असल्याचे दिसले. नाशिक जिल्ह्यासह राज्यातील काही केंद्रांवर रात्री नऊ वाजेपर्यंत मतदान चालू होतं. त्यामुळे मतदानाची जिल्हानिहाय अंतिम आकडेवारी येण्यास विलंब झाला. रात्री ११.४५ वाजता हाती आलेल्या आकडेवारीनुसार राज्यात ६५.११ टक्के मतदान झालं आहे.मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर या चार मोठ्या शहरांमध्ये मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने विशेष प्रयत्न केले होते. मात्र त्याला फारसे यश आले नसल्याचे पाहायला मिळाले. राज्यात सर्वाधिक ८२ टक्के मतदान कोल्हापूर जिल्ह्यातील कागल मतदारसंघात झाल आहे. तेथे वैद्याकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार) समरजितसिंह घाटगे यांच्यातच चुरशीची लढत होत आहे. सर्वात कमी ४१ टक्के मतदान हे कल्याण पश्चिम मतदारसंघात झालं आहे. मंत्रालय व विधानभवन ही सत्तेची प्रमुख केंद्रे असलेल्या कुलाबा मतदारसंघांत टक्केवारी वाढवण्यासाठी बरेच प्रयत्न झाले असले तरी तिथे ४५ टक्केच मतदान झाले आहे.

### विधानसभा सार्वत्रिक निवडणूक

२०२४ साठी राज्यात सायंकाळी ६ वाजेपर्यंत राज्यात सरासरी ६५.११ टक्के मतदान झालं आहे. गेल्या ३० वर्षांमध्ये पहिल्यांदाच राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याचं पाहायला मिळालं आहे. १९९५ साली ७१.६९ टक्के मतदानाची नोंद झाली होती. अलीकडच्या काही वर्षांमध्ये राज्यात कधीच ६५ टक्क्यांहून अधिक मतदान झालं नव्हतं. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१.३९ टक्के मतदानाची नोंद झाली होती. तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ६१.४ टक्के मतदान झालं होतं. मागील निवडणुकीच्या तुलनेत यंदा ३.७ टक्के मतदान वाढलं आहे. ही मतदानाची वाढलेली आकडेवारी निवडणुकीच्या निकालात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. दरम्यान, २०१९ मध्ये राज्यात ८.८५ कोटी नोंदणीकृत मतदार होते. त्यात गेल्या पाच वर्षांमध्ये ९.५ टक्के वाढ झाली असून राज्यात आता ९.६९ टक्के मतदार आहेत.

### राज्यातील जिल्हानिहाय मतदानाची टक्केवारी

| | |
|---|---|
| बीड | ६७.७९ टक्के |
| अहमदनगर | ७१.७३ टक्के |
| अकोला | ६४.९८ टक्के |
| अमरावती | ६५.५७ टक्के, |
| औरंगाबाद | ६८.८९ टक्के, |
| भंडारा | ६९.४२ टक्के, |
| बुलढाणा | ७०.३२ टक्के, |
| चंद्रपूर | ७१.२७ टक्के, |
| धुळे | ६४.७० टक्के, |
| गडचिरोली | ७३.६८ टक्के, |
| गोंदिया | ६९.५३ टक्के, |
| हिंगोली | ७१.१० टक्के, |
| जळगाव | ६४.४२ टक्के, |
| जालना | ७२.३० टक्के, |
| कोल्हापूर | ७६.२५ टक्के, |
| लातूर | ६६.९२ टक्के, |
| मुंबई शहर | ५२.०७ टक्के, |
| मुंबई उपनगर | ५५.७७ टक्के, |
| नागपूर | ६०.४९ टक्के, |
| नांदेड | ६४.९२ टक्के, |
| नंदुरबार | ६९.१५ टक्के, |
| नाशिक | ६७.५७ टक्के, |
| उस्मानाबाद | ६४.२७ टक्के, |
| पालघर | ६५.९५ टक्के, |
| परभणी | ७०.३८ टक्के, |
| पुणे | ६१.०५ टक्के, |
| रायगड | ६७.२३ टक्के, |
| रत्नागिरी | ६४.५५ टक्के, |
| सांगली | ७१.८९ टक्के, |
| सातारा | ७१.७१ टक्के, |
| सिंधुदुर्ग | ६८.४० टक्के, |
| सोलापूर | ६७.३६ टक्के, |
| ठाणे | ५६.०५ टक्के, |
| वर्धा | ६८.३० टक्के, |
| वाशिम | ६६.०१ टक्के, |
| यवतमाळ | ६९.०२ टक्के |

# दिल्ली जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर

चिंता:जगातील पहिल्या दहा प्रदूषित शहरांमध्ये देशातील आठ शहरे



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी


: गेल्या काही दिवसांपासून दिल्लीची हवा अति धोकादायक पातळीवर गेली आहे. बुधवारी (२० नोव्हेंबर) दुपारी चार वाजता दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक ४३८ वर गेला होता. दिल्लीची गणना जगातील सर्वांधिक प्रदूषित शहर म्हणून होत आहे. जगातील पहिल्या दहा प्रदूषित शहरांमध्येही देशातील आठ शहरांचा समावेश होता. राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (२० नोव्हेंबर) दुपारी चार वाजताच्या आकडेवारीनुसार दिल्ली जगातील सर्वांधिक प्रदूषित शहर होते. दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक चार वाजता ४३२ वर गेला होता. हवेत २.५ मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण २९१, तर १० मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण ४१३, कार्बन मोनोऑक्साईडचे प्रमाण १२२९ पीपीबी, सल्फर डायऑक्साईचे प्रमाण ५ पीपीबी, नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण २८ पीपीबी, ओझोन १० पीपीबी होते.दुसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेशातील हापूर (हापुड) असून, हवा गुणवत्ता निर्देशांक ४२२ इतका होता. हवेत २.५ मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण २६३, तर १० मायक्रॉनच्या पान २ वर...

### उत्तर भारतातील शहरे प्रदूषित

जगातील पहिल्या दहा सर्वांधिक प्रदूषित शहरांमध्ये भारतातील आठ शहरांचा समावेश आहे. दिल्ली पाठोपाठ उत्तर भारतातील अनेक शहरांतील हवेची गुणवत्ता वाईट किंवा अति धोकादायक पातळीवर पोहचली आहे. हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार प्रदूषित शहरे (कंसात हवा गुणवत्ता निर्देशांक) नवी दिल्ली – ४३८, हापूर (उत्तर प्रदेश) – ४३०, भिवानी (हरियाणा) ४०४, दकिंग (चीन) ३९८, गुरुग्राम (हरियाणा) ३८३, गझियाबाद (उत्तर प्रदेश) – ३६५, सोनीपत (हरियाणा) ३५१, मेरठ (उत्तर प्रदेश) ३५१, अद दिरियाह (सौदी अरेबिया) ३४४, नोएडा (उत्तर प्रदेश) ३४१.

# गव्हर्नर शक्तीकांत दासांचा डीपफेक व्हिडीओ व्हायरल

गंभीर:आरबीआयचा नागरिकांना सावधानतेचा इशारा



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या काही वर्षांपासून फसवणुकींच्या गुन्ह्यात कमालीची वाढ झाली आहे. यातच जगात तंत्रज्ञानाचा जसा फायदा आहे, तसा त्याचा तोटाही आहे. कारण तंत्रज्ञानाचा वापर करुन अनेकदा सायबर गुन्हेगारांनी अनेकांची मोठी फसवणूक केल्याच्या अनेक घटना समोर आलेल्या आहेत. आता अशीच एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांचा एक डीपफेक व्हिडीओ तयार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एवढंच नाही तर यामधून गुंतवणुकीचा सल्ला देण्यात आला असून यासंदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर पान २ वर...

### आरबीआयने काय स्पष्टीकरण दिलं?

आरबीआयने म्हटलं की, त्यांचे अधिकारी अशा कोणत्याही प्रकाराला समर्थन देत नाही. हे व्हिडीओ बनावट असून आम्ही अशा कोणत्याही आर्थिक गुंतवणुकीचा सल्ला देत नाहीत. अशा परिस्थितीत सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या डीपफेक व्हिडीओपासून नागरिकांनी सावध राहावं, असं आवाहन आरबीआयकडून करण्यात आलं आहे.

# टक्का वाढतो तेव्हा फायदा : फडणवीस

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी आज आज (२० नोव्हेंबर) मतदान पार पडलं. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद झालं. आता या निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी समोर येणार आहे. त्यामुळे अनेक उमेदवारांची धाकधूक वाढली असून राज्यातील जनतेचं लक्ष निकालाकडे लागलं आहे. मात्र, आज मतदान



संपल्यानंतर एक्झिट पोलच्या अंदाज समोर आले आहेत. वेगवेगळ्या एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील महायुतीला जास्त जागा मिळतील असा अंदाज एक्झिट पोल्सने वर्तवला आहे.

दरम्यान, एक्झिट पोल्सने महायुतीला जास्त जागा मिळतील असा अंदाज वर्तवला असला तरी काही एक्झिट पान २ वर...

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

जेव्हा मतदानाचा टक्का वाढतो तेव्हा–तेव्हा त्याचा फायदा भारतीय जनता पक्षाला होतो. यावेळी देखील आतापर्यंत समोर आलेल्या आकडेवारीनुसार मतदानाची आकडेवारी चांगल्या प्रकारे वाढली आहे. त्यामुळे मला वाटतं की भारतीय जनता पक्ष आणि महायुतीला त्याचा नक्कीच फायदा होईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.



# गौतम अदाणींवर गंभीर आरोप

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांच्यावर कोट्यवधी रुपयांची लाच दिल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. अमेरिकेच्या वकिलांनी बुधवारी सांगितले की, अदाणी आणि त्यांचा पुतण्या सागर अदाणी यांच्यासह इतर सात जणांनी २० वर्षांत २ अब्ज डॉलर्सचा नफा मिळवून देणारा आणि भारतातील सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्यासाठी भारतीय सरकारी अधिकाऱ्यांना २६५ दशलक्ष डॉलर्सची लाच दिली. रॉयटर्स या वृत्तसंस्थेने या प्रकरणी अदाणी समूहाशी संपर्क साधला, मात्र त्यावर अदाणी समूहाकडून उत्तर दिले गेले नाही. याआधी अमेरिकेतील हिंडेनबर्ग रिसर्च संस्थेने आरोप केले होते, अदाणी समूहाने त्यावेळी हे आरोप तात्काळ फेटाळून लावले होते.

अमेरिकेच्या सरकारी वकिलांनी असेही म्हटले की, अदाणी पान २ वर...

# बिटकॉइन'प्रकरणी छत्तीसगडमध्ये छापे

घोटाळा: राजकीय लागेबांधे असल्याचा 'ईडी'ला संशय

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या काळात कथितरीत्या बिटकॉइन व्यवहार झाल्याच्या आरोपावरून छत्तीसगडमध्ये सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बुधवारी छापा टाकला. सुप्रिया सुळे आणि नाना पटोले यांच्यावर भाजपने याबाबत आरोप केल्याच्या दुसऱ्याच दिवशी ही कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, केंद्रीय अन्वेषण विभागानेही (सीबीआय) कूटचलन घोटाळा प्रकरणी गौरव मेहताला समन्स बजावले आहे. गेन बिटकॉइन फसव्या योजनेचे विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल गुन्हे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर गतवर्षी डिसेंबरमध्ये सीबीआयकडे हस्तांतरित करण्यात आले होते. मेहता याला लवकरात लवकर चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश सीबीआयने दिले आहेत.

# गटाच्या नेत्याचा मोठा दावा

अंदाज: महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभेच्या निवडणुकीसाठी आज (२० नोव्हेंबर) मतदान पार पडलं. आता या निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार असल्यामुळे या निकालाकडे जनतेचं लक्ष लागलं आहे. राज्यात कोणाचं सरकार येणार? महाविकास आघाडीचं सरकार येणार की महायुतीचं सरकार येणार? हे निकालानंतर स्पष्ट होईल. मात्र, याबाबत अनेकांना उत्सुकता लागली आहे. दरम्यान,



आज मतदान संपल्यानंतर एक्झिट पोलचे अंदाज समोर आले आहेत.

जवळपास सर्वच एक्झिट पोलच्या अंदाजानुसार राज्यात महायुतीला जास्त जागा मिळतील आणि महायुतीचं सरकार सत्तेत येईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

तसेच एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महाविकास आघाडीला धक्का बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे आता या एक्झिट पोलच्या अंदाजावर राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया पान २ वर...

निष्कर्ष | युनिसेफने नोंदवला अहवाल

# २०५० पर्यंत भारतात ३५ कोटी लहान मुले

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

२०५० सालापर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या ३५ कोटींवर पोहोचण्याचा अंदाज युनिसेफच्या एका अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. आजच्या तुलनेत भारतात १०.६ कोटी मुलांची घट होणार असली तरी चीन, नायजेरिया आणि पाकिस्तानसह भारताचा जागतिक मुलांच्या लोकसंख्येचा वाटा १५ टक्के इतका असेल, असे सांगतानाच पर्यावरणीय आणि हवामान बदलांच्या परिणामांपासून या मुलांचे रक्षण करण्याचे मोठे आव्हान भारतासमोर असेल, असेही या अहवालात सुचवण्यात आले आहे.युनिसेफचा प्रमुख अहवाल ह्यस्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन २०२४ह्ण, ह्यद फ्यूचर ऑफ चिल्ड्रन इन अ चेंजिंग वर्ल्डह्ण बुधवारी नवी दिल्लीत जाहीर करण्यात आला. यात लोकसंख्याशास्त्रीय



बदल, हवामान बदलाची संकटे आणि सीमावर्ती तंत्रज्ञानावर प्रकाश टाकण्यात आला आहे. हा अहवाल २०५० पर्यंत लहान मुलांच्या जीवनाला नवा आकार देणारा ठरणार आहे. ऊर्जा आणि संसाधन संस्थेच्या (टेरी) सुरुची भडवाल, युनिसेफचे युवा अधिवक्ता कार्तिक वर्मा यांच्यासह युनिसेफच्या भारताच्या प्रतिनिधी सिंथिया मॅकॅफ्रे यांनी या अहवालाचे अनावरण केले.अहवालात असे निदर्शनास आणले आहे की, २०५०पर्यंत लहान मुलांना तीव्र हवामान आणि पर्यावरणीय संकटांचा सामना करावा लागेल आणि सन २००० च्या तुलनेत जवळजवळ आठ पट जास्त मुले अतिउष्णतेच्या पान २ वर...

### शहरी लोकसंख्या निम्म्यावर

या अहवालानुसार २०५० पर्यंत भारतातील निम्मी लोकसंख्या शहरी भागांत राहणार असेल. या अनुषंगाने भविष्यात बालस्नेही तसेच हवामान बदलांना समर्थपणे तोंड देणाऱ्या नगर नियोजनाची गरज असल्याचे मतही अहवालात व्यक्त करण्यात आले आहे.

# भाजपाला पाठिंबा दिला म्हणून खून

खळबळ:उत्तर प्रदेशच्या पोटनिवडणुकीतील घटना

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र आणि झारखंड राज्यात विधानसभा निवडणूक होत असताना आज उत्तर प्रदेशमध्ये विधानसभेसाठी पोटनिवडणूक होत आहे. महाराष्ट्रात एकीकडे मतदानादरम्यान गोंधळाची परिस्थिती दिसत आहे. अनेक ठिकाणी उमेदवारांवर हल्ले करण्यात आले आहेत. तर काही ठिकाणी पैसे वाटपाच्या घटना घडल्यामुळे तणाव निर्माण झाला आहे. उत्तर प्रदेशच्या करहळ येथेही अशीच घटना घडली असून एका दलित तरुणीचा निर्वस्त्र अवस्थेतील मृतदेह बॅगेत आढळून आला आहे. या घटनेमुळे मैनपूरी जिल्ह्यातील करहळ विधानसभेत खळबळ माजली आहे. मृत तरुणीच्या आईने या घटनेनंतर समाजवादी



पक्षावर आरोप केला आहे. प्रशांत यादव नामक व्यक्तीने माझ्या मुलीचा राजकीय वैमनस्यातून खून केल्याचा आरोप केला आहे.मृत तरुणीच्या आईने पुढे म्हटले की, माझ्या मुलीचा खून करण्यापूर्वी तिच्यावर बलात्कार करण्यात आला होता. माझ्या मुलीने भाजपाला मतदान करण्याचा निर्णय बोलून दाखविल्यामुळे प्रशांत नाराज होता. जर तिने समाजवादी पक्षाला मतदान केले नाही तर परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी धमकी तिला देण्यात आली होती.मृत तरूणीच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबर रोजी तिला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. दोन प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, काल (१९ नोव्हेंबर) दुचाकीवरून आलेल्या दोघा जणांनी तरूणीला बळजबरीने दुचाकीवर बसवून पळवून नेले. त्यानंतर पान २ वर...

## नगरांचे नागवेकरण

नागरीकरणाचा वेग देशात सर्वाधिक असलेल्या राज्यात आज नवे सत्ताधीश निवडण्यासाठी मतदान होईल. निम्म्यापेक्षा अधिक महाराष्ट्र आज शहरात रमतो. या शहरांचे आजचे चित्र काय? या प्रश्नाच्या उत्तरात राजकीय प्रामाणिकपणा अध्याहृत नाही. अशा राजकीय प्रामाणिकपणाची आपणास सवय नसल्याने त्याचा विचार करण्याची गरज नाही. राजकीय प्रामाणिकपणा याचा अर्थ या शहरांच्या नाड्या सद्या:स्थितीत त्या त्या शहरवासीयांच्या हाती नसणे. म्हणजे या शहरांत गेल्या दोन ते पाच वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच न होणे. त्या न झाल्यामुळे उद्याचे फिरोजशहा मेहता, युसुफ मेहेरअली वा शांताराम मिरजकर अशा तळमळीच्या महापौरांस महाराष्ट्र मुकला असे अजिबात नाही. पण या शहरांच्या निवडणुका न घेऊन लोकशाहीची एक पायरीच आपण कशी अलगदपणे दूर करून टाकत आहोत हे यातून दिसते. ही सर्व शहरे गेले काही दिवस ‘आगे बढो, हम तुम्हारे साथ है’च्या घोषणांनी दुमदुमली असतील आणि कधी एकदा या विधानसभा निवडणुका होतील असे या शहरवासीयांस झाले असेल. निवडणुकीच्या या उन्मादी काळात या शहरांसंदर्भातील एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष झाले. ‘रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया’चा देशातील शहरांच्या वित्तस्थितीबाबतचा ताजा अहवाल हा तो महत्त्वाचा विषय. राज्यातीलच नव्हे तर देशातील महापालिका किती भिकेला लागलेल्या आहेत याविषयी ‘लोकसत्ता’ वारंवार आक्रंदन करीत आला आहे. आता थेट यास रिझर्व्ह बँकच दुजोरा देत असून ‘लोकसत्ता’ मांडत असलेल्या मुद्द्यांस यातून प्रशस्त सांख्यिकी आधार मिळतो. त्यावर ऊहापोह करणे आवश्यक ठरते.रिपोर्ट ऑन म्युनिसिपल फायनान्सेस’ असे रिझर्व्ह बँकेच्या या संदर्भातील अहवालाचे नाव. या अहवालात २०१९-२० पासून २०२३-२४ या कालावधीत देशातील तब्बल २३२ महापालिकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास आणि निष्कर्ष नमूद करण्यात आले आहेत. हा अहवाल आणि त्यातील निरीक्षणे यांची आम्ही का दखल घ्यावी असा प्रश्न काहींस पडू शकेल. यातील एकाही शहराशी संबंध असो वा नसो; सर्वांनीच यातील निरीक्षणांची दखल घ्यायला हवी. असे म्हणण्यामागे एक निश्चित कारण आहे. ते असे की देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) ६० टक्के वाटा या शहरांचा आहे. हे प्रमाण लक्षणीय. इतक्या प्रचंड, खंडप्राय देशातील फक्त २३२ शहरांतूनच ६० टक्के सकल राष्ट्रीय उत्पादन देशाच्या तिजोरीत जमा होत असेल तर ही संपत्तीनिर्मिती किती असमान आहे हे यातून दिसून येते. विकासातील हे असंतुलन काळजी वाढवणारे. विशेषत: २०५० सालापर्यंत या देशातील ५० टक्के जनता शहरांत असेल असे मानले जात असताना अन्य देशांस अर्थविकासाची गती किती वाढवायला हवी, हे यातून दिसते. यात आवर्जून लक्षात घ्यावा असा मुद्दा म्हणजे जेथून देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातील ६० टक्के वाटा तयार होतो त्या शहरांचे महसुली उत्पन्न मात्र सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या जेमतेम ०.६ टक्के इतकेच आहे. याचा अर्थ उघड आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत निर्णायक वाटा उचलणारी शहरे मात्र स्वत: भिकारी आहेत. यातही एक मेख आहे. या २३२ शहरांची एकूण कमाई जीडीपीच्या ०.६ टक्के असली तरी ती सरसकट नाही. या २३२ पैकी फक्त १० शहरांचे उत्पन्नच इतके मोठे आहे की त्यांचा वाटा या ०.६ टक्क्यांत ६० टक्के इतका भरतो. म्हणजे या देशात ६ लाख ४० हजार ९३० खेडी, चार हजार शहरे, ३०० मोठी शहरे आहेत. तथापि त्यातील फक्त २३२ इतक्या शहरांतून जीडीपीचा ६० टक्के वाटा हाती लागतो आणि या २३२ शहरांतीलही फक्त १० महानगरे त्यांत सिंहाचा वाटा उचलतात. या २३२ महानगरांच्या एकूण उत्पन्नातील ६० टक्के वाटा त्यातील मोजक्या दहा शहरांचा. म्हणजे आपल्या शहरांचे वास्तव किती चिंता करावी असे आहे, हे यातून कळेल.चिंता अशासाठी की ही शहरे स्वत:च्या पायावर उभी नाहीत. या शहरांना स्वत:चा महसूल नाही आणि असलेला महसूल वाढवावा कसा याचे मार्ग त्यांच्याकडे नाहीत. काही महानगरपालिकांनी भांडवली बाजारात जाऊन रोखेनिर्मिती करून निधी मिळवला. पण तो एकदाच. आणि दुसरे असे की आज ना उद्या हे रोखे परत द्यावे लागतात आणि मधल्या काळात त्यावर व्याज द्यावे लागते. परतफेडीच्या वेळी तितका निधी या महानगरांच्या हाती हवा. त्याचीच मुळात बोंब. आणि या रोख्यांत गुंतवणूक करणारा ज्याने हे रोखे काढले त्याचा ताळेबंदही पाहणार. त्या आघाडीवर दुसरी बोंब. म्हणजे महानगरपालिकांना चांगला उत्पन्नाचा स्रोत नसेल तर अशा पालिका रोखे काढणार कशा? काढले तरी ते विकले जाणार कसे? आणि समजा विकले गेलेच तर त्यांच्या परतफेडीचे काय, हे मुद्दे. अशा परिस्थितीत रोखे हा मार्ग सरसकटपणे आपल्या शहरांस उपलब्ध नाही. अशा वेळी ही शहरे ज्या राज्यात आहेत त्या राज्य सरकारकडे पैशासाठी तोंड वेंगाडण्याखेरीज या शहर नियोजकांस पर्याय काय? ही शहरे राज्याकडे पाहणार आणि राज्ये केंद्राकडे पाहणार, असे हे आपले प्रशासकीय वास्तव. शहरांना जो काही महसूल मिळतो त्यापैकी ३० टक्के राज्यांच्या वित्तीय यंत्रणांकडून येतो. केंद्र सरकारच्या तिजोरीत जे काही डबोले जमा होते त्यातूनही काही रक्कम शहरांस दिली जाते. तिचे प्रमाण काय असावे? तर जेमतेम २.५ टक्के इतकेच. म्हणजे जी शहरे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात जवळपास ६० टक्के इतका वाटा उचलतात त्या शहरांस केंद्र सरकार हे असे वाटाण्याच्या अक्षता लावते.

# चला निळ्या निशाना खाली सर्वांनी एक व्हा रे

बाबासाहेब म्हणतात की मी पाहिजे तेवढा पैसा शकलो असतो. अरे त्या स्वप्नसुंदरीला माझ्या इशारावर नाचू शकलो असतो. हिरे मोती माणिक क या बिचनावर मी लोळू शकलो असतो. पण माझ्या समाजाला मी वाचवू शकलो नसतो... मत हे दान नसून तो तुमचा अधिकार आहे. संविधानात त्यास मताधिकार असे म्हटले आहे. तुमच्या या अधिकाराची जाणीव ठेवून स्वाभिमानाने व सन्मानाने तुमचा मताधिकार वापरा - डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंबेडकरी चळवळीशी गद्दारी करून आपले स्वाभिमान घाण ठेवून प्रस्तावित पक्षांच्या दावणीला बसणाऱ्या लाचार आणि गद्दार नेत्यांसाठी हा संदेश आहे...

बेईमानो का वर्तमान ही नही भविष्य ही चंगा है
और इमानदारो के यहा रोटी के लिये दंगा है...

तो इस देश का भ्रष्टाचार कैसे कम हो सकता है मेरे यारो क्यु की यहा पाप धोने के लिए गंगा है...

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी माझा समाज गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत जाण्यासाठी एक व्यासपीठ तयार करून दिले होते. ते म्हणजे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेल्या पाठी आमच्या काही भ्रष्ट नेत्यांनी त्या रिपाईचे तुकड्या तुकड्यांमध्ये विभागणी केली.

तुझ्या हाती तूप आलं तुझ्या हाती साय मग
समाजाचा काय रे गड्या समाजाचा काय....
तुझ्या हाती आहे गड्या समाजाची नाडी
अरे राहायला माडी तुला बसायला गाडी...

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची घटना लिहिली आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पार्टीच रजिस्ट्रेशन करण्याच्या अगोदरच बाबासाहेबांचे निर्वाण झालं. निधन झालं परंतु रिपाईची संकल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बनवलेली होती.

परंतु आमच्या समाजातील काही नेत्यांनी बाबासाहेबांच्या रिपाईला टिकून ठेवले नाही.

तुझ्या हाती आहे गड्या समाजाची नाडी
अरे राहायला माडी तुला बसायला गाडी...

अरे सांग तुझा धंदा अशा आहे तरी काय या समाजाचं काय रं गड्या समाजाच काय...

काम नाही धाम नाही सकाळी उठूनी सुख तुला सारं गड्या येते रे कुठूनी....डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्याईने आज आमचा समाज सुटा बुटामध्ये आला. बाबासाहेबांच्या पुण्याइने चांगले चांगले कपडे अंगावर घालायला मिळाले शिकायला मिळालं आमचे काही बांधव मोठमोठ्या पदावरती गेले परंतु हि शोकांतिका आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आमचे बांधव विसरून गेले...आज यांना जय भीम घेण्याची सुद्धा लाज वाटते... म्हणून बांधवानो त्यावेळेसचा काळ आठवा एक तरफ आंबेडकर खिलाफ दुनिया सारी थी और मजब के नाम पर हि गद्दार थी लाख दुश्मन मेरे भीम का कुछ नही बिगाड सके

लेकीन कलम तलवार से भी भारी थी...

आज आमच्या बाबासाहेबांना भक्त मंडळीच बेईमान झाले नाहीत तर हा समाज सुद्धा बाबासाहेबाला बेईमान झालेला आहे....

बांधवानो आज आमचं जिकडून तिकडून खच्चीकरण कसं होईल याच्याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.... आजही आमचा मुलगा आमची मुलगी शिक्षणापासून वंचित कसे राहावे यासाठी अतोनात प्रयत्न केले जात आहेत... आजही उच्च पदावर क्लासवन ऑफिसर आजही आमच्या समाजा मधुन जास्त प्रमाणात नाहीत... आमच्या समाजात जास्त प्रमाण कुणाचा असेल तर चपराशी....

म्हणून एका ठिकाणी वामनदादा कर्डक असे लिहितात की,ओ इस देश के वासी है तो...हम भी भारत वासी है प्यारी उनकी मथुरा है तो... प्यार हमारी सांची है... वामन तेरे ही जनता क्यु सदियो से प्यासी है... उनके सारे अफसर है पर तेरे क्यू चपराशी है...

हॉटेल आत रोज रोज जेवता कसे रे गल्ल्यावरी काहीतरी ठेवता कसे रे... रोज रोज खात्या तुम्ही कोंबड्याची पाय... पण या समाजाचं काय रे गड्या समाजाचा काय...

तुझ्यासाठी तुझ्याकडे सार काय आहे र... पण माझ्यासाठी तुझ्याकडे आहे तरी काय र...

फुसते रोज वामनला वामनची माय...अरे समाजाचं काय रे गड्या समाजाचं काय...

तुझ्या हाती तूप आलं तुझ्या हाती साय मग
समाजाचा काय र गड्या समाजाचा काय

ट्ठ जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायचे आहे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. पण असे झाले का ? तर नाही आज आपण राजकीय सत्तेपासून कोसोदूर आहोत.कारण आपल्यामध्ये एकी नाही.दुसरी गोष्ट म्हणजे आपल्यातल्या आपल्यात विविध पक्ष आणि विविध संघटना तयार करण्यात आले आहे. आजघडीला प्रत्येकजण स्व:ताला राष्ट्रीय अध्यक्ष समजतो आणि निवडणूकीमध्ये मात्र प्रस्थापित पक्षांना जाहीरपणे पाठिंबा देऊन मोकळा होतो. हि अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे हे आपल्या लक्षात कधी येणार आहे. भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते वाणीत भीम आहे करणीत भीम असता वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते आतातरी आपला वापर कोण करून घेत आहे त्याचे आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे.भिरभिरत्या पाखरांनो संधी ही नामी आली घरट्यात परतुनी या येन्याची वेळ आली आहे. आज आंबेडकरी चळवळीतील सर्व भरकटलेल्या कार्यकर्त्यांना व नेत्यांना आज एकत्र येऊन काम करण्याची खऱ्या अर्थाने काळाची गरज आहे कारण तुमच्यापुढे खूप मोठे आव्हान उभे आहेत.आणि प्रस्थापित पक्ष काही काही करून छोट्या छोट्या गोष्टीचे अमीष दाखवून समाजाची मोठ्या प्रमाणात दिशाभूल करून आंबेडकर चळवळीच्या कार्यकर्त्यांचा फक्त आणि फक्त वापरच करून घेत आहेत. काम झाले की,मात्र त्यांना मिठाच्या खड्यासारखा बाजूला काढून देत असल्यामुळे आंबेडकरी समाजातील कार्यकर्ता कुठल्याही परिस्थितीत आपला वापर न होऊ देता व स्वाभिमान न घाण ठेवता आपल्याला ना बिकनेवाला समाज तयार करायचा आहे. त्यामुळे आपल्या समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन इतरांचा बदलतो मागणेवाले समाज मे दलाल पैदा होते है देनेवाले समाज मे लाल पैदा होते है.

आज संबंध महाराष्ट्रामध्ये नाही तर संपूर्ण देशामध्ये आंबेडकरी चळवळीला संपवण्याची कटकारस्थान चालू असून आंबेडकरी चळवळीचे राजकीय अस्तित्व संपण्याच्या मार्गावर काही विषमतावादी विचाराचे लोक पूर्ण ताकतीनिशी काम करत आहे त्यामुळे आंबेडकरी समाजाला जागृत होऊन हे षड्यंत्र हाणून पडायचे आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून बहुजनांना नाहीतर संपूर्ण देशातील जनतेला समान न्याय देण्याची काम केले पण इथल्या प्रस्तावित पक्षांनी भारत देश स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंत बहुजन समाजाचा



सिध्दार्थ रमेशराव कांबळे
मो.९७६६२७५३५८

फक्त आणि फक्त वापरच करून घेत आहे. आणि त्यांना त्यांच्या संविधानिक अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम खऱ्या अर्थाने येथील मनुवादी विचारसरणीचे लोक करत असून वेळोवेळी बहुजन समाजाचे मोठ्या प्रमाणात शोषण करून त्यांना गुलामीच्या खाईत ढकळण्याचे काम राजकीय सत्तेतील लोक करीत आहेत. कुणामुळे झालं तुझ्या जिवनाच सोनं लेका जाऊ नको विसरून तु साहेब झाल्यास मोठा बाबासाहेबांच्या पुण्याईने नव्हती नशिबात तुझ्या साधी बैलगाडी आज तुझ्याकडे आली चार चाकी गाडी डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले की, गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या मग तो बंड करून उठेल त्यामुळे आतातरी बहुजन समाजाने जागृत होऊन राजकीय सत्तेतील लोकांनी आपल्या विरोधात रचलेले षड्यंत्र ओळखून आपण वेळेतच सावध झाले पाहिजे अन्यथा आपली येणारी पिढी गुलामीच्या खाइतचं मरणार आहे.

जर तुम्हाला गुलामीकडे वाटचाल नको तर आंबेडकर चळवळीशी गद्दारी करू नका आणि या देशाची राज्यकर्ती जमात बनायचे असेल तर संघटित होऊन संघर्ष करावा लागेल.तरच खऱ्या अर्थाने आपण या देशाची राज्यकर्ती जमात बनू शकतो.जखडबंद पायातील साखळदंड तडातड तुटले तू ठोकताच दंड झाले गुलाम मोकळे,भीमा तुझ्या जन्मामुळे काल कवडीमोल जीणे वामनचे होते आज जुळे जगताशी प्रेमाचे बुद्धाकडे जग हे वळे,भीमा तुझ्या जन्मामुळे...

महाराष्ट ही फुले,शाहु,डॉ.आंबेडकर,यांची जन्मभुमी कर्मभुमी म्हणून ओळखली जाते..पण सध्या या महाराष्टात फुले,शाहु, डॉ.आंबेडकर,यांचे विचार थोडे थोडे संपविण्याचे काम काही मनुवादी विचारसरणीच्या प्रस्थापित राजकीय पक्षाकडून होत असुन याला पण आपणच जबाबदार आहोत ...कारण स्व:ताला आंबेडकरवादी म्हणुन घेणार हेच लोक ...मनुवादी विचारधारेच्या लोकांच्या वळणी जाऊन बसत असल्यामुळे आंबेडकरी चळवळीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.. तुझ्या पाऊल खुणा भिमराया तुझे पोर पुसु लागलीरे ...आणि वैर्याच्या पंगतीला जाऊन बसु लागलीरे....आतातरी जागे व्हा नाही तर येणारा काळ तुम्हाला कधीच माफ करणार नाही......विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वाशी गद्दारी करणारे लोक कुत्र्याची मौत एक दिवस मरतात... म्हणुन बाबाशी बेमानी करु नये.....एक पक्ष...एक नेता ...निळया झेंड्याखाली ....सर्वानी एक व्हा रे...

थमते विकत मागणाऱ्या माणसाला समाजाचा पाठिंबा नसतो,म्हणून तर तो द्रव्याच्या बळावर आपली लायकी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करतो.अशा उमेदवाराकडून समाजहिताची व राष्ट्र हिताची कार्ये होत नाहीत.पैसेवाला जर कायदेमंडळात गेला तर तो पैसेवाल्या लोकांचे हितसंरक्षण करील व तो सर्वसामान्य व गरिबांच्या हिताच्या आड येईल.म्हणून मत विकण्याचे पाप तुम्ही करू नका,व आपली दिशाभूल करून घेऊ नका.डॉ .बाबासाहेब आंबेडकर ( संदर्भ खंड १८ /१/ ४६६)

## पान एक वरून

**दिल्ली जगातील सर्वाधिक**

प्रदूषकांचे प्रमाण ४४७, कार्बन मोनोऑक्साईडचे प्रमाण १५५३ पीपीबी, सल्फर डायऑक्साईचे प्रमाण ८ पीपीबी, नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण १२ पीपीबी, ओझोन १४ पीपीबी होते.तिसऱ्या क्रमांकावर चीनच्या हेलॉन्गजियांग प्रातांतील दकिंग शहर असून, वायू गुणवत्ता निर्देशांक ४०१ आहे. हवेत २.५ मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण २५२, तर १० मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण ३३०, कार्बन मोनोऑक्साईडचे प्रमाण १३१६ पीपीबी, सल्फर डायऑक्साईचे प्रमाण ६ पीपीबी, नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण ३५ पीपीबी, ओझोन ८ पीपीबी होते. हवा निर्देशांकानुसार, ० ते ५० हवा निर्देशांक असेल तर चांगली हवा, ५० ते १०० निर्देशांक असेल तर समाधानकारक, १०० ते २०० निर्देशांक असेल तर मध्यम, २०० ते ३०० निर्देशांक असेल तर वाईट, ३०० ते ४०० निर्देशांक असेल तर अत्यंत वाईट, ४०० पेक्षा जास्त निर्देशांक असेल तर हवा अति धोकादायक मानली जाते.

**गव्हर्नर शक्तीकांत दासांचा डीपफेक**

व्हायरल आहे. मात्र, यानंतर आरबीआयकडून एक निवेदन जारी करण्यात आलं असून अशा खोट्या व्हिडीओच्या विरोधात आरबीआयने जनतेला सावधानतेचा इशारा दिला आहे. यासंदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.दरम्यान, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९ नोव्हेंबर २०२४ रोजी एक निवेदन जारी करत सामान्य नागरिकांना सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओबद्दल चेतावणी दिली आहे. फसवणूक करणाऱ्यांनी या व्हायरल व्हिडीओमध्ये आर्थिक सल्ला देताना दाखवण्यात आलं असल्याचं वृत्तात म्हटलं आहे.याबाबत आरबीआयने म्हटलं की, ही माहिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निदर्शनास आली आहे की, गव्हर्नर शक्तीकांत दास यांचा एक बनावट व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये आरबीआय गव्हर्नर काही गुंतवणूक योजना सुरू करताना किंवा समर्थन करताना दाखवण्यात आलं आहे. मात्र, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अशा प्रकारे आर्थिक गुंतवणुकीचा सल्ला देत नाही, असं आरबीआयकडून सांगण्यात आलं आहे.

**टक्का वाढतो तेव्हा फायदा**

पोल्सनुसार महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये काँटे की टक्कर आणि अपक्ष आणि इतर पक्षाच्या हाती सत्तेची सूत्र जाण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, आता महाराष्ट्रात कोणाची सत्ता येणार? कोणता पक्ष मोठा पक्ष ठरणार? हे सर्व आता निकालाच्या दिवशी म्हणजे २३ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होणार आहे. मात्र, समोर आलेल्या वेगवेगळ्या एक्झिट पोल्सनी अंदाजावर आता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. ‘मतदानाचा टक्का जेव्हा वाढतो तेव्हा त्याचा फायदा भाजपाला होतो’, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**गौतम अदाणींवर गंभीर**

आणि अदाणी ग्रीन एनर्जीमधील कार्यकारी अधिकारी आणि माजी सीईओ विनीत जैन यांनी कर्जदार आणि गुंतवणूकदारांपासून हा भ्रष्टाचार लपवून ठेवला आणि ३ अब्ज डॉलरपेक्षा अधिक कर्ज आणि रोखे गोळा केले.गौतम अदाणी यांच्यावर करण्यात आलेल्या दोषारोपानुसार, या प्रकरणात सामील असलेल्या षडयंत्रकर्त्यांनी गौतम अदाणी यांना न्युमेरो युनो आणि द बिग मॅन या सांकेतिक नावांनी खासगीरित्या संबोधले होते. तर लाच देण्याची प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी सागर अदाणी यांनी आपला मोबाइल फोन वापरला होता.

**२०५० पर्यंत भारतात ३५**

लाटेला सामोरे जातील असेही निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. हवामान आणि पर्यावरणीय संकटे ही कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये विशेषत: आफ्रिकेत जास्त प्रमाणात आहेत. जेथे संसाधने कमी आहेत. तेथे सर्वाधिक मुले असतील. भारतापुढील आव्हानांचा विचार करता तातडीने पावले उचलण्याची गरज या अहवालात अधोरेखित करण्यात आली आहे. त्यादृष्टीने वर्तमानात घेतलेले निर्णय या मुलांच्या भविष्याला आकार देतील, असे सिंथिया मॅक्फे यांनी म्हटले. मुले आणि त्यांचे हक्क हे धोरण बनवताना केंद्रस्थानी ठेवणे हे समृद्ध, शाश्वत भविष्य घडवण्यासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादनही यावेळी त्यांनी केले.जगभरातील जवळपास एक अब्ज मुले आधीच तीव्र हवामानाचा सामना करत आहेत. मुलांच्या हवामान जोखीम निर्देशांकात भारत २६ व्या क्रमांकावर आहे. भारतीय मुलांना अतिउष्म, पूर आणि वायू प्रदूषण, विशेषत: ग्रामीण आणि कमी उत्पन्न असलेल्या समुदायांमध्ये तीव्र जोखमीचा सामना करावा लागतो. अहवालानुसार, हवामानातील संकटांमुळे त्यांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि पाण्यासारख्या अत्यावश्यक स्त्रोतांवर परिणाम होईल. यावेळी भडवाल यांनी हवामानविषयक तातडीच्या पावले उचलण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

**गटाच्या नेत्याचा मोठा**

समोर येत आहेत. एक्झिट पोलच्या अंदाजावर शिवसेना ठाकरे गटाची प्रतिक्रिया आली आहे. ठाकरे गटाचे नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे की एक्झिट पोलचे सर्व्हे काहीही आले तरी महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल, असा दावा दानवे यांनी केला आहे.

**अंबादास दानवे काय म्हणाले? :** एक्झिट पोलच्या अंदाजांवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी म्हटलं की, आम्ही काही एक्झिट पोल पाहिले आहेत आणि ऐकले आहेत. मात्र, ज्या प्रकारे आम्ही जमिनीशी जोडलेलो आहोत आणि आम्ही अनेक ठिकाणी पाहत आहोत. महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल. एक्झिट पोल काहीही आले तरी लोकांनी महायुतीला हटवण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीचा सुपडा साफ होईल. आता सर्व्हे काहीही आले तरी महाविकास आघाडीचं सरकार येईल, असं अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे.

**भाजपाला पाठिंबा दिला**

आज तिचा मृतदेह आढळून आला. पोलिसांना मृतदेहाची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि प्राथमिक तपास सुरू केला. तसेच शवविच्छेदन करण्यासाठी तिचा मृतदेह पाठवून देण्यात आला.ज्येष्ठ पोलीस अधिकारी विनोद कुमार यांनी सांगितले की, करहळ येथून काल रात्री २३ वर्षीय तरुणीचे अपहरण झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. तिचा मृतदेह आज सकाळी आढळून आला. तिच्या वडिलांनी दोन लोकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. एकाचे नाव प्रशांत यादव आणि दुसऱ्याचे नाव मोहन कथेरिया आहे. दोघांनाही अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे.

## पान सहा वरून

**परळीत लोकशाहीची ‘ऐशी की तैशी ’**

कुणी आक्षेप घेणार का याची प्रतिक्षेत होतं . नाही तर चुपचाप हातावर हात ठेवून उभा होतं. नंदागौळ,धर्मापुरी,डिग्रस, सिरसाळा व अन्य काही ठिकाणी मतदान प्रकिया सुरळीत झाली नाही . भयानक दहशत परळी मतदारसंघात निर्माण झाली असुन परळी मतदारसंघात भारतीय लोकाशाही राहिली नाही . लोकांची आता हिच भावना झाली आहे .

**अग्निरोधक यंत्रणेसाठी निधीचा**

जळीत कांडाची वाट पहात आहे काय असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला असुन बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये तातडीने अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीची तातडीने तरतूद करण्यात यावी अशी मागणी डॉ . गणेश ढवळे, शेख युनुस,शिवशर्मा शेलार यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्य मंत्री यांना केली असुन आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

**राज्यात भाजपा महायुतीचं**

प्रतिसाद मिळाला. महायुती बाबत जनता सकारात्मक आहे. सरकारने जनतेच्या हितासाठी ज्या काही योजना राबवल्या आहेत, त्या यशस्वी ठरल्या आहेत, लोकांचा महायुतीबद्दल विश्वास वाढला आहे.त्यामुळे आमचं सरकार बहुमतांनी पुन्हा सत्तेवर येईल. फेक नरेटिव्हचा या निवडणूकीत परिणाम होणार नाही. २०१९ मध्ये निवडणूक लढवत असताना देखील मी महाराष्ट्रात सभा घेत होते, मला ही निवडणूक फारशी वेगळी वाटली नाही असं त्या एका प्रश्नांच्या उत्तरात बोलताना म्हणाल्या.

**परळी रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होईल :** परळीच्या निवडणुकीबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, ही निवडणूक सहज व सोपी झाली. महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होतील असा मला विश्वास आहे.

**घाटनांदूर मतदान केंद्रावर**

झाले असून त्यांना अंबाजोगाई येथे उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर बीड जिल्हा मजूर संघाचे चेअरमन बंसीधर सिरसाट यांच्या कारवर दगडफेक करण्यात आली. त्यात सिररसाट जखमी झाले आहेत. दरम्यान मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया दोन तास बंद पडली होती. परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी भेट देऊन दोन तासानंतर मतदान प्रक्रिया सुरू करण्यात आली. घटनास्थाळास बीडचे पोलीस अधीक्षक अनिल बारगळ अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके अंबाजोगाईचे पोलीस उपअधीक्षक अनिल चोरमले, दरम्यान निवडणूक निरीक्षक सुनील अंची पाका यांनी पाहणी केली. तसेच मुरंबी येथील मतदान केंद्र २८७ व चौथेवाडी येथील मतदान क्र.२८६ केंद्रावर हि गोंधळ झाल्याने चौथेवाडी येथील दोन तासानंतर मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे.

**परळीमध्ये लोकशाहीची**

कॅमेऱ्यारे सुरू ठेवण्यात येतील. आदि बाबीसह प्रशासनाने यातील एकही नियम पाळला नाही. येथील लोकप्रतिनिधींनी गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरून बोगस मतदान आणि बुथवर करून घेतले. मतदारांना धमक्या दिल्या. त्यांच्या हाताला फक्त शाई लाऊन परत पाठवले. विरोधी पक्षातील उमेदवारांना शिवीगाळ, धक्काबुक्की, मारहाण करण्यात आली. याचे सर्व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेले आहेत. परळी विधानसभा मतदारसंघाची निवडणूक ही लोकशाही मार्गाने न करता येथील प्रशासनाला हाताशी धरून हुकूमशाही मार्गाने झाली तसेच हायकोर्टाच्या आदेशाचेही पालन न करता एक प्रकारे बलिदानाचा दिले आहे त्यामुळे या लोकशाहीला अर्थ राहिला नाही. आम्ही मतदान अधिकाऱ्याकडे रीतसर तक्रारी केल्या. परंतु त्यांनी ऐकून घेतल्या नाहीत राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार आहोत. येथील लोकप्रतिनिधींनी हुकूमशाही मार्गाने आमदार होण्यापेक्षा लोकशाही मार्गाने आमदार होऊन दाखवावे असेही कॉंग्रेसचे परळी शहर अध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे.

**ट्रॉमा केअर युनिट**

पाठवला आहे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर या दोन राष्ट्रीय महामार्गावरील अतिवेगाने वाहन चालवणे त्याचबरोबर उखडलेले रस्ते आणि रखडलेल्या कामांमुळे वाढत्या अपघातांची संख्या पाहता तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना आपला जीव गमवावा लागत असुन तातडीने पाटोदा आणि नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, स्वप्निल गलधर, निळकंठ वडमारे, विजय लव्हाळे, शेख मुबीन यांनी डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना करत दि.१२ डिसेंबर रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याचा ईशारा दिला होता. त्यापुर्वीच याची दखल घेत डॉ.अशोक थोरात यांनी पाटोदा व नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ लातुर यांना पाठवला आहे. याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरू झाल्यास ब-याच अपघातग्रस्तांना दिलासा मिळणार आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# भाजपच्या नोट जिहादने तावडेंचे वाटोळे

## सुषमा अंधारेचा गंभीर आरोप

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना राजकारणात मोठा भूकंप पाहायला मिळाला.



भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी विरारमधील एका हॉटेलात ५ कोटी रुपये वाटल्याचा आरोप बविआकडूनकरण्यात आला. यावरून आता महाराष्ट्राचे राजकारण चांगलेच तापले असून शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केलाय.

विनोद तावडे नालासोपाऱ्यात विवांत हॉटेलमध्ये त्यांचे उमेदवार राजन नाईक यांच्या भेटीसाठी आले होते. दोन्ही नेते हॉटेलमध्ये बसलेले असतानाच अचानक बहुजन विकास आघाडीचे प्रमुख हितेंद्र ठाकूर आणि त्यांचे पुत्र क्षितीज ठाकूर आपल्या कार्यकर्त्यांसह विवांत हॉटेलमध्ये आले. विनोद तावडे पैसे वाटपासाठी बॅगेत ५ कोटी रुपये घेऊन आले, असा आरोप ठाकूर पिता-पुत्रांनी केला. यावेळी क्षितीज ठाकूर यांनी पैशांचे बंडल देखील माध्यमांना दाखवले.

या घटनेनंतर ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी एबीपी माझाशी बोलताना विनोद तावडे आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी विरोधी पक्षातील नेत्यांच्या हेलिकॉप्टर्समधील बॅगा तपासल्या. मग विनोद तावडे यांची बॅग तपासण्यात आली नव्हती का?, असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला. यानंतर सुषमा अंधारे यांनी ट्विट करत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. 'भाजपच्या नोट जिहादने तावडेंच्या आयुष्याचा भयंकर विनोद झाला, पुन्हा एकदा मराठा नेतृत्व संपवलं, देवेंद्रजी खुश तो बहुत होंगे आप?' असे सुषमा अंधारे यांनी म्हटले.



✦ अनेक उमेदवार कोट्यधीश यातील ठाकरेंचे ९९ टक्के उमेदवार कोट्यधीश

# २९ टक्के उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर एकूण १५८ लहान-मोठे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यापैकी सहा मोठे पक्ष दोन आघाड्यांचा भाग म्हणून निवडणूक लढवत आहेत.

दरम्यान निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार राज्यात अपक्षांसह विविध पक्षांचे एकूण ४ हजार १३६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म (एडीआर) ने यापैकी २ हजार २०१ उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रांची तपासणी करून अहवाल तयार केला आहे. त्यानुसार जवळपास २९ टक्के म्हणजेच ६२९ उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. त्यापैकी ४१२ जणांवर खून, अपहरण, बलात्कार असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. ५० उमेदवारांवर महिलांशी संबंधित गुन्ह्यांचे आरोप आहेत. तसेच कोट्यधीश उमेदवारांमध्ये सर्वाधिक ठाकरेंचे ९९ टक्के उमेदवार कोट्यधीश असल्याची माहिती आहे.

भाजप - १४९ पैकी १४४, शिवसेना - ८१ पैकी ७९राष्ट्रवादी - ५९ पैकी ५८, काँग्रेस - १०१ पैकी ९४, शिवसेना (उबाठा)- ९५ पैकी ९४, राष्ट्रवादी (शरद पवार) - ८६ पैकी ८०, २६ उमेदवारांनी आपली संपत्ती शून्य असल्याचे जाहीर केले आहे.

## ६८६ उमेदवारांचे वय २५ ते ४० वर्षांच्या दरम्यान

सुमारे ३१टक्के म्हणजेच ६८६ उमेदवारांचे वय २५ ते ४० वर्षांच्या दरम्यान आहे. ३१७ (१४इ) उमेदवार ६१ ते ८० वर्षे वयोगटातील आहेत, तर दोघे उमेदवार ८० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत. या २ हजार २०१ पैकी फक्त २०४ महिला उमेदवार (९ टक्के) आहेत. उमेदवारांची शैक्षणिक पात्रता पाहता, ४७इजणांचे शिक्षण पाचवी ते बारावीच्या दरम्यान आहे. ७४ उमेदवार डिप्लोमा धारक, ५८ साक्षर, तर दहा जणांनी स्वतःला अशिक्षित म्हणून घोषित केले आहे.

# बारामतीत पैसे वाटपाच्या तक्रारी!

देशोन्नती वृत्तसंकलन

**बारामती :** बारामतीचे प्रांताधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार बारामतीत पैसे वाटपाच्या तक्रारी आल्या होत्या. त्यावरून काल रात्री शरयू टोयोटा या युगेंद्र पवार यांच्या मालकीच्या शोरूम वर तर अजित पवार यांचे निकटवर्तीय किरण गुजर अध्यक्ष असलेल्या नटराज नाट्यमंदिर या संस्थेवर छापेमारी केली. अर्थात दोन्ही ठिकाणी काही ही आढळून आले नसल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

बारामतीत पहिल्यांदाच ग्रामपंचायतच्या पातळी सारखी निवडणूक सुरू असून, गावागावात व गटगटात ही निवडणूक विभागली गेली आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीवर पक्षीय कार्यकर्त्यांचे व नेत्यांचे व्यक्तिगत लक्ष आहे. त्यातून ही निवडणूक जास्त चुरशीची बनली आहे. त्यातून पैसे वाटपाच्या तक्रारी सुरू झाल्या आहेत. लोकसभेनंतर विधानसभेच्या निवडणुकीतही पैसे वाटप होत असल्याच्या तक्रारी आल्याने निवडणूक आयोगाच्या पथकाने लक्ष ठेवले आहे. काल रात्री युगेंद्र पवार यांच्या शरयू टोयोटा या शोरूम मधील कार्यालयावर निवडणूक आयोगाच्या पथकाने तपासणी केली. मात्र यामध्ये काहीही आढळून आले नसल्याची माहिती प्रांताधिकारी वैभव नावडकर यांनी दिली आहे. दरम्यान नावडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार अजित पवार यांचे निकटवर्तीय असलेल्या किरण गुजर यांच्या अध्यक्षते खालील नटराज नाट्यमंदिर या संस्थेवर ही निवडणूक आयोगाच्या पथकाने तपासणी केली होती. तिथे ही काही आढळले नसल्याची माहिती नावडकर यांनी दिली आहे. एकूणच बारामती मध्ये पहिल्यांदाच निवडणुकीच्या काळात पैसे वाटपा वरून कार्यालयांची झाडझडती होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## माजी नगरसेविका रेखा टिंगरे यांच्या पतीवर हल्ला

**पुणे :** पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षात प्रवेशकरून वडगाव शेरीमधील उमेदवार बापूसाहेब पठारे यांना पाठिंबा देणाऱ्या माजी नगरसेविका रेखा टिंगरे यांच्या पतीवर अज्ञातांनी भरदुपारी हल्ला केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. त्यांच्या गाडीच्या काचा दगड मारून फोडण्यात आल्या असून, यात चंद्रकांत टिंगरे जखमी झाले आहेत. याघटनेने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. विश्रांतवाडी परिसरातील धानोरी जकातनाका परिसरात हा प्रकार दुपारी अडीचच्या सुमारास घडला आहे. चंद्रकांत टिंगरे हे माजी नगरसेविका रेखा टिंगरे यांचे पती आहेत. गेल्याच आठवड्यात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (शरद पवार गट) प्रवेश केला होता. शरद पवार यांच्या उपस्थित त्यांनी हा प्रवेशकरून वडगाव शेरीचे उमेदवार बापूसाहेब तुकाराम पठारे यांचा प्रचार सुरू केला होता.

# गृहखात्याने तावडेंवर पाळत ठेवली अन् पकडले जातील यासाठी पूर्ण बंदोबस्त झाला : संजय राऊत

देशोन्नती वृत्तसंकलन



**मुंबई :** विरारमधील एका हॉटेलमध्ये भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे पैसे वाटत असल्याचा गंभीर आरोप बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर आणि आमदार क्षितीज ठाकूर यांनी केला. मात्र, हे आरोप नंतर भाजपाकडून फेटाळून लावण्यात



आले. यानंतर विनोद तावडे यांनीही हे सर्व आरोप फेटाळले.

मात्र यानंतर विरोधकांनी भाजपावर टीकेची झोड उठवली आहे. यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही या प्रकरणावर प्रतिक्रिया देत गंभीर आरोप केले आहेत. 'विनोद तावडे बाबतची पैसे वाटपाची माहिती महाराष्ट्रातील भाजपाच्या प्रमुख नेत्याने हितेंद्र ठाकूरांना दिली. महाराष्ट्राच्या गृहखात्याकडून विनोद तावडेंवर पाळत ठेवली गेली आणि तावडे पकडले जातील यासाठी बंदोबस्त झाला', असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला.

'भारतीय जनता पक्षाने कितीही लपवण्याचा प्रयत्न केला तरी जे घडलं ते कॅमेऱ्यासमोर आहे. यामधून भाजपाचा खरा चेहरा समोर आला. विनोद तावडे हे पक्षाचे महासचिव आहेत. मग एका पक्षाच्या महासचिवाकडे ५ कोटी रुपये आढळून आले. पैशाचं वाटप करत असतानाच तिकडे बहुजन विकास आघाडीचे लोक गेले आणि पैसे जप्त केले. त्या ठिकाणी काही वेळ गोंधळ झाला. तसेच भाजपाच्या महासचिवांना कोंडून ठेवलं. या सगळ्या प्रकरणावर आता भाजपा काय खुलासा करणार? महाराष्ट्राच्या निवडणुकीमध्ये प्रत्येक मतदारसंघात किमान १५ ते २० कोटी रुपये आचारसंहितेच्या आधी पोहोचले आहेत', असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

नाशिकला आज एका हॉटेलमध्ये शिंदे आणि अजित पवार गटाचे पैसे पकडले गेले. मुंबई आणि ठाण्यातून पैसे वाटण्यासाठी खास माणसांच्या नेमणुका झाल्या आहेत. राम रेपाळे नावाच्या एका माणसासह माझ्याकडे १८ लोकांची नावे आहेत. मात्र, विनोद तावडे हे स्वतः पैसे वाटतात हे आश्चर्य आहे. आमच्या बॅगा तपासतात. निवडणूक आयोगाच्या लोकांनी आमच्यामागे जो ससेमिरा लावला. जर भाजपा, शिंदे आणि अजित पवारांच्या लोकांमागे ससेमिरा लावला असता तर किमान महाराष्ट्राच्या तिजोरीत १ हजार कोटी मिळाले असते', असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला.

# आदित्य ठाकरेंच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची वेळ संपलेली असतानाही वरळी मतदारसंघाचे ठाकरे गटाचे उमेदवार आदित्य ठाकरे यांनी सोशल मिडिया पोस्टकरून नियमभंग केल्याचा आरोप भाजपने केला आहे. भाजपच्या विरोधात आक्षेपार्ह ट्वीट केल्याप्रकरणी मुंबई भाजप सचिव प्रतिक कर्पे यांनी आदित्य ठाकरेंच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे लेखी स्वरूपात तक्रार केली आहे. आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी अशी मागणी भाजपकडून करण्यात आली आहे.



आदित्य ठाकरे यांच्या एक्स (पूर्वीचे ट्विटर) अकाउंटवरून मंगळवारी सकाळी ११ वाजल्याच्या सुमारास पोस्ट केल्याचा आरोप भाजपने केला आहे. 'भाजपाच्या कच्च्या बच्च्यांची अत्यंत घाणेरडी मानसिकता! फोडा आणि राज्य करा खोटं बोला आणि जिंकायचा प्रयत्न करा! निवडणूक आयोग आणि मुंबई पोलीस कधी अशा घाणेरड्या द्वेष निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करणार का आणि त्यांना अटक करणार का? तुमच्या मतांसाठी आमच्या जनतेच्या भावनांशी खेळू नका!,' असे ट्वीट आदित्य ठाकरेंनी केलं होते.

त्यामुळे निवडणूक आचासंहितेच्या नियमाप्रमाणे मतदानाच्या ४८ तासांपूर्वी प्रचार किंवा राजकीय टीका टिप्पणी करण्यास बंदी आहे. मात्र, या ट्विटमुळे झालेले नियमांचे उल्लंघन लक्षात घेता निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेतली पाहिजे, अशी मागणी भाजपने केली आहे. 'आदित्य ठाकरे यांनी खोडसाळ पद्धतीने द्वेष पसरवण्याच्या हेतूने आणि सर्वसामान्य मतदारांची दिशाभूल करण्यासाठी भारतीय जनता पक्षावर टीका केली आहे. त्यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहेत, त्यांच्या या कृत्याचा आम्ही जाहीर निषेध करत असून निवडणूक आयोगाने आदित्य ठाकरे यांच्यावर त्वरित करून त्यांचे एक्स अकाऊंटव निर्बंध आणावेत,' अशीही मागणी मुंबई भाजप सचिव प्रतिक कर्पे यांनी केली आहे.

# भ्रष्टाचारातून कमावलेल्या पैशातून मते विकत घेण्याचा प्रकार

## तावडे प्रकरणावर पटोलेंचा आरोप

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** निवडणुकीत सत्ताधारी पक्षाकडून सरकारी यंत्रणांचा गैरवापर केला जात असून पोलीस वाहनातून रसद पाठवल्याच्या बातम्याही आल्या. आतातर भाजपाचे राष्ट्रीय नेते माजी शिक्षणमंत्री विनोद तावडे हे पैसे वाटत असल्याचे उघड झाले आहे. भाजपा शिंदे सरकारचा सपशेल पराभव होत असल्याने आता ते भ्रष्टाचारातून कमावलेल्या पैशाच्या जोरावर जनतेची मते विकत घेऊन निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न असून भाजपाचा खरा चेहरा उघडा पडला आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

यासंदर्भात नाना पटोले यांनी माध्यमांना निवेदन पाठवले आहे. त्यात ते म्हणतात, १९



नोव्हेंबर २०२४ रोजी विरारच्या हॉटेल विवांतामध्ये भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस व माजी शिक्षणमंत्री विनोद तावडे हे पैसे वाटत असल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. ही रक्कम ५ कोटी रुपये होती असे सांगण्यात येत आहे, विविध वृत्त वाहिन्यांवरही त्यासंदर्भातील



बातम्या दाखवण्यात आल्या. विरारमधील पैसे वाटपाचा हा प्रकार अत्यंत गंभीर आहे, हे प्रकरण दडपण्याचा प्रकार होऊ शकतो, पण निवडणूक आयोगाने कोणाच्याही दबावाखाली न येता निष्पक्ष, पारदर्शक व कडक कारवाई करून कायद्याच्या राज्यात सर्व समान आहेत हे दाखवून द्यावे. निवडणूक आयोगाने याप्रकरणी भारतीय जनता पक्ष व विनोद तावडे यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पटोले यांनी केली आहे.

# पैसे वाटत नसतील तर मग विनोद तावडे गोडाऊनमध्ये लपून का बसले?

## क्षितीज ठाकूरांचा सवाल

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** विनोद तावडे जर पैसे वाटायला आले नसतील मग ते हॉटेलच्या गोडाऊनमध्ये का लपून बसले? राजन नाईक हे महिलांच्यामध्ये जाऊन का लपून बसले होते? असा सवाल क्षितीज ठाकूर यांनी विचारले. त्या ठिकाणी १९ लाख रुपये सापडले ते भाजपच्या निवडणुकीच्या खर्चात दाखवणार आहेत का? असा सवाल विचारत त्यांनी निवडणूक आयोगाकडून काहीही अपेक्षा नसल्याचे म्हटले. आता मतदारच यांना उत्तरं देतील असा इशाराही क्षितीज ठाकूर यांनी दिला.

विरारमधील एका हॉटेलमध्ये भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे हे पैसे वाटप करत असल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीचे नेते क्षितीज ठाकूर यांनी केला. ते म्हणाले की, 'त्या



ठिकाणी महिला होत्या. पण महिला पोलिसांनी त्यांची तपासणी केली नाही. विनोद तावडे जर पैसे वाटायला आले नव्हते तर गोडाऊनमध्ये लपण्याची गरज काय होती? आम्ही आलो त्यावेळी विनोद तावडे हे गोडाऊनमध्ये पळून गेले. त्या ठिकाणी काही महिला सापडल्या. त्यांना नाव विचारलं तर काही सांगितलं नाही, पत्ता सांगितला नाही. अनेक महिला या बाथरूममध्ये लपल्या होत्या. जर तिकडे चुकीचं होत नव्हतं तर राजन नाईक महिलांमध्ये लपून का बसले होते?'

क्षितीज ठाकूर म्हणाले की, 'त्या हॉटेलमध्ये असणाऱ्यांकडे अनेक डायऱ्या होत्या. आमच्या हाती लागलेल्या डायरीमध्ये कुठल्या माणसाला किती पैसे द्यायचं आहेत याची नोंद. प्रत्येक माणसाकडे ही डायरी होती. त्यांच्या कार्यकर्त्यांकडे बॅग द्यायला तयार नाहीत. काय होतं त्या बॅगांमध्ये? त्यावेळी स्पेशल फोर्सला बोलावण्यात आले. हळूहळू त्यांच्या लोकांना बाहेर जायला सांगितले.

आमचे कार्यकर्ते त्याच ठिकाणी होते. आम्ही कुणालाही हात लावला नाही. त्या ठिकाणी १९ लाख रुपये सापडले ते निवडणुकीच्या खर्चात दाखवणार आहेत का? असा प्रश्न क्षितीज ठाकूर यांनी विचारला. या प्रकरणावर पोलिसांनी आणि निवडणूक आयोगाने कारवाई करावी. पण मला त्यांच्याकडून अपेक्षा नाही.

# एवढा पैसा आला कुठून सुप्रिया सुळेंचा सवाल

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** भाजप नेते विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटल्याचा आरोप 'बविआ'कडून करण्यात आला आहे. याप्रकरणी विरार येथील एका हॉटेलमध्ये बविआ कार्यकर्त्यांनी राडा घातला. यावरून आता मतदानाच्या एक दिवस आधीच राजकीय वातावरण तापले आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एवढा पैसा आला कुठून, भाजपनेच नोटबंदी केली होती ना? असा सवाल सुळे यांनी केला आहे.



विनोद तावडे यांच्यावर आरोप होत आहे. यावर माझा विश्वास बसत नाही. मात्र, हे धक्कादायक आहे. मला कधीच असं वाटलं नव्हतं की, भाजपच्या ओरीजनल लोकांकडून अशी कृती घडेल. तसेच, ५ कोटींचं वाटप होतेय. श्रीनिवास पवार यांच्या ऑफिसमध्ये पोलीस येतात, अनिल देशमुखांवर हल्ला होतो, या देशात चाललंय तरी काय? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

याचबरोबर, ब्लॅक मनीमुळे नोटबंदी भाजपनेच केली होती. मग भाजपकडे हे पाच कोटी रुपये आले कोठून? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला आहे. तसेच, या गलिच्छ कृतीचा मी निषेध करत भाजपचे सरकार येणार नाही, हे त्यांच्या नेत्यांना समजले असेल असा टोलाही सुप्रिया सुळे यांनी लगावला. याशिवाय, विनोद तावडेंकडून ही अपेक्षा नव्हती. ते महाराष्ट्रात मंत्री राहिलेत, ते शिक्षणमंत्री होते असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. नेमकं काय आहे प्रकरण? मतदानाच्या आदल्या दिवशीच विरारमध्ये भाजप नेते विनोद तावडे यांनी पैसे वाटल्याचा आरोप 'बविआ'ने केला आहे. 'बविआ'चे नेते हितेंद्र ठाकूर यांनी आरोप केला की, मला भाजपावाल्यांचा फोन आला, तावडे ५ कोटी घेऊन येतायेत, इतका मोठा नेता पैसे का घेऊन येतील, असं मला वाटलं. पण जेव्हा इथं आलो तेव्हा पैसे वाटप सुरू असल्याचं दिसलं. तावडे आल्यापासून इथं सीसीटीव्ही बंद होते, त्यामुळे हॉटेलवरही कारवाई व्हायला हवी. मला डायरी मिळाली, निवडणूक आयोग आणि पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी त्यांनी केली.

# विनोद तावडे यांना तात्काळ अटक करा

## काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांची मागणी

**मुंबई :** भारतीय जनता पक्ष आणि महायुती पराभवाच्या भितीने मोठ?या प्रमाणात पैसा आणि सत्तेचा गैरवापर करत असून, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना वसई विरारमध्ये मतदारांना पैसे वाटताना रंगेहात पकडले आहे. विनोद तावडे यांनी पाच कोटी रुपये वाटल्याचे आरोप केले जात आहेत. त्यामुळे तावडे यांना तात्काळ अटक केली पाहिजे अशी मागणी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली आहे.

या संदर्भात प्रतिक्रिया देताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सत्ताधारी भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांकडून मोठ्या प्रमाणात सत्ता आणि पैशाचा प्रचंड गैरवापर सुरु आहे. आज वसई विरार येथे भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना मतदारांना पैसे वाटताना नागरिकांनी रंगेहात पकडले. घटनास्थळी पोलीस व निवडणूक आयोगाचे अधिकारी उपस्थित होते. घटनास्थळावरून १० लाख रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली आहे. पण अद्याप तावडे यांना अटक केली नाही. प्रचार संपल्यानंतर नियमानुसार मतदारसंघाच्या बाहेरची व्यक्ती थांबू शकत नाही पण तावडे यांनी वसई विरारला जाऊन कार्यकर्त्यांची बैठक घेतली असे सांगितले आहे.



**नागपूर :** जिल्ह्यात २१७ उमेदवार निवडणूक रिंगणात असून ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणुकीसाठी मतदान पथके मतदानस्थळी रवाना झाली आहेत.

# अनिल देशमुखांच्या हल्यामागे भाजप नेत्याचा हात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** विधानसभा निवडणुकीच्या प्रचारा तोफा शांत झाल्यावर सोमवारी रात्री माजी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुखांवर हल्ला झाला. या हल्यामागे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा हात असल्याचा आरोप अनिल देशमुख यांचे पुत्र सलील यांनी केला होता. आता या पक्षाचे प्रवक्ते प्रवीण कुंटे पाटील यांनी थेट भाजपच्या नेत्याचे नावच घेतले आहे.

### ठाकुरांना सुरक्षा, देशमुखांना नाही

माजी गृहमंत्री अनिल देशमुखांवर हल्यानंतर शासनाकडून भाजपचे उमेदवार चरणसिंह ठाकूरांच्या घरी तातडीने सुरक्षा वाढवली. मात्र देशमुखांच्या घरी अद्याप सुरक्षा वाढली नसल्याचाही आरोप प्रवीण कुंटे पाटीलांनी केला.

### स्वतः देशमुखांनीच हल्ला करवला : फुके

अनिल देशमुखांवरील हल्ला म्हणजे 'बनावट दगडफेक' आहे. पोलिसांनी तातडीने एसआयटीमार्फत या प्रकरणाचा तपास सुरू करावा. त्यामुळे उद्याच्या मतदानावर परिणाम होणार नाही. तपासात सत्य कळले पाहिजे. सलील देशमुखांचा पराभव पाहून देशमुख यांनी हे केले. अनिल देशमुख काहीतरी नाट्य करतील, असा इशारा यापूर्वीच अनेक सभांमध्ये जनतेला दिल्याचे, माजी मंत्री व भाजप नेते परिणय फुके यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.

अनिल देशमुख यांच्या नागपुरातील सिव्हिल लाईन्स येथील निवासस्थानी मंगळवारी (१९ नोव्हेंबर) झालेल्या पत्रकार परिषदेत प्रवीण कुंटे पाटील बोलत होते. याप्रसंगी पक्षाचे नेते किशोर गजभिये, नुतन रेवतकर आणि इतरही नेते उपस्थित होते. प्रवीण कुंटे

### प्रवीण कुंटे पाटीलांचा आरोप



पाटील म्हणाले, काटोल मतदारसंघातून अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख निवडणूक लढवत आहे. त्यांच्या विरोधात भाजपने चरणसिंह ठाकूरांना उमेदवारी दिली. ठाकूर हे कंत्राटदार असून भाजपचे माजी मंत्री व आमदार परिणय फुकेंचे व्यवसायिक भागिदार आहे. परिणय फुके हे भाजपमधील सर्वोच्च नेत्याच्या जवळचे आहे. त्यामुळे फुके यांनी आपले वजन वापरून ठाकूर यांना उमेदवारी मिळवून दिली. आता काटोलमध्ये राजकीय गुंडगिरीतून ठाकूर यांना जिंकवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**सुविचार** -पाहिलेलं स्वप्न पूर्ण होतं; पडलेलं नाही.


# सगळेच गौडबंगाल....!

भाजपचे ज्येष्ठ नेते, राष्ट्रीय सचिव विनोद तावडेंवर निवडणूक आयोगाने निवडणुकीत पैसे वाटप केल्याचा आरोप करीत 'एफआयआर' दाखल केला. या सगळ्या प्रकरणाची सुरुवात विरारच्या एका हॉटेलपासून झाली. विनोद तावडे एका हॉटेलमध्ये थांबले असून तिथे ते पैसे वाटप करीत असल्याचा संशय आल्यावरून बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी हॉटेलला घेराव घालत मोठा गोंधळ घातला. त्यावेळी भाजप आणि बविआ कार्यकर्त्यांमध्ये वादावादीदेखील झाली. त्याच दरम्यान बविआचे नेते हितेंद्र ठाकूर, त्यांचे सुपुत्र विद्यमान आमदार क्षितिज ठाकूर घटनास्थळी दाखल झाले. त्यामुळे तणाव अधिकच वाढला. बविआच्या कार्यकर्त्यांनी हॉटेलमध्ये घुसून पैशाची काही पाकिटे हस्तगत केली. त्या पाकिटातल्या नोटा विनोद तावडेंच्या अंगावर भिरकावण्यात आल्या. हितेंद्र ठाकूरांनी विनोद तावडेंवर मतदारांना वाटण्यासाठी २५ कोटी सोबत आणल्याचा आरोप केला. बविआच्या कार्यकर्त्यांनी विनोद तावडेंना रंगेहाथ पकडल्यानंतर त्यांनी आपल्याला किमान २५ वेळा दूरध्वनीवरून संपर्क साधत प्रकरण मिटविण्याची विनंती केल्याचेही हितेंद्र ठाकूर म्हणाले. हितेंद्र ठाकूरांनी इतका गंभीर आरोप केल्यानंतर एक संयुक्त पत्रकार परिषद घेण्याचा प्रयत्न केला. या पत्रकार परिषदेला हितेंद्र ठाकूरांसोबत विनोद तावडेदेखील त्यांच्या बाजूलाच उपस्थित होते; परंतु निवडणूक अधिकाऱ्यांनी आचार संहितेचे कारण समोर करीत ही पत्रकार परिषद रोखली. दरम्यान, निवडणूक अधिकाऱ्यांनी पोलिसांची कुमक मागविल्यानंतर संबंधित हॉटेल सील केले. तत्पूर्वी या हॉटेलमधून जवळपास दहा लाख रोकड जप्त करण्यात आली. त्या आधारेच विनोद तावडेंच्या विरोधात 'एफआयआर' दाखल करण्यात आला. हॉटेलमधील परिस्थिती निवळल्यानंतर क्षितिज ठाकूर यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना हॉटेलच्या बाहेर काढले. त्यानंतर सुरुवातीला विनोद तावडे एकटेच त्यांच्या गाडीत बसले; परंतु नंतर त्यांना हितेंद्र ठाकूरांनीच आपल्या वाहनातून परिसराच्या बाहेर पडण्याची विनंती केली, त्यामुळे विनोद तावडे आपल्या वाहनातून बाहेर आले आणि हितेंद्र ठाकूरांच्या वाहनात जाऊन बसले. हे वाहन आमदार क्षितिज ठाकूर स्वतः चालवित होते. या प्रकाराबद्दल उपस्थित माध्यमकर्मींनी हितेंद्र ठाकूरांना विचारले असता त्यांनी आम्ही जेवायला जात आहोत, विनोद तावडे आमचे मित्र आहेत, कदाचित आता उरलेले पैसे ते आम्हाला देतील, असे मिश्किल उत्तर दिले. हितेंद्र ठाकूरांनी ज्या विनोद तावडेंवर गंभीर आरोप केला त्याच विनोद तावडेंना त्यांनी आपल्या वाहनातून त्या परिसरातून बाहेर काढले, शिवाय ते आपले मित्र असल्याचेही त्यांनी म्हटले, हे सगळे काय गौडबंगाल आहे, हे सांगता येणार नाही. निवडणूक आयोगाने या प्रकरणात 'एफआयआर' दाखल केला असला तरी हे प्रकरण अधिक ताणल्या जाणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. खरे तर विनोद तावडेंसारखा ज्येष्ठ नेता असे थेट पैसे वाटण्याचे काम कसा करतो, ते असे काही करीत असल्याची बातमी तात्काळ विरोधी नेत्यांना कशी मिळते, हितेंद्र ठाकूरांचे बोलणे प्रमाण मानायचे तर भाजपच्याच नेत्यांनी ही बातमी त्यांना दिली, असे असेल तर प्रकरणाचा गुंता अधिकच वाढतो. विनोद तावडेंना अडकविण्याचा प्रयत्न झाला असावा आणि नंतर हे प्रकरण आपल्याही अंगाशी येऊ शकते, हे लक्षात आल्यावर ज्या कुणी त्यांना अशाप्रकारे अडकविण्याचा प्रयत्न केला त्यांनीच हितेंद्र ठाकूरांवर प्रकरण ताणून न धरण्यासाठी दबाव आणला असावा, अशीही शंका व्यक्त केली जात आहे. एकूणच हे संपूर्ण प्रकरण खूपच संशयास्पद वाटत आहे. इकडे विरारमध्ये हे सगळे नाट्य घडत असताना तिकडे डहाणू विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या पूर्वसंध्येला वेगळेच नाटक पाहायला मिळाले. बहुजन विकास आघाडीकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सुरेश पाडवी यांनी निवडणुकीत मते खाण्यापेक्षा योग्य उमेदवाराला मते मिळावी यासाठी आपण या लढतीतून बाहेर पडत भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा केली. या मतदारसंघातून लढत असलेले भाजपाचे उमेदवार विनोद मेढा यांना त्यांनी आपला पाठिंबा जाहीर केला. बहुजन विकास आघाडीच्या उमेदवाराने ऐनवेळी घेतलेल्या या निर्णयामुळे संशयकल्लोळात भरच पडली आहे.

# हे एक मोठ्ठे आव्हान....!

महाराष्ट्राने यापूर्वी अनेक निवडणुका पाहिल्या आहेत. राजकीय तणावाचे अनेक प्रसंग महाराष्ट्राने अनुभवले आहेत; परंतु आज दिसतो तितका तणाव, तितके द्वेषपूर्ण वातावरण पूर्वी कधीही या सुसंस्कृत राज्याने अनुभवले नव्हते. मतदानाचा दिवस जसा जसा जवळ येत गेला तसा तसा हा तणाव आणि द्वेष वाढतच गेला. त्यातूनच अनेक ठिकाणी उमेदवारांवर किंवा त्यांच्या निकटवर्तियांवर हल्ले होण्याचे प्रकरण घडले. शाब्दिक आरोपांच्या पातळीने अगदी अत्यंत खालचा तळ गाठला. परस्पर द्वेषाने तर जात-पात, धर्म अशा सगळ्या भिंती ओलांडल्या. पैशांचा नंगानाच यावेळी जसा पाहायला मिळाला तसा पूर्वी कधीही पाहायला मिळाला नव्हता. एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या राष्ट्रीय सचिवावर पैसे वाटल्याचा गुन्हा दाखल होणे, हे किमान महाराष्ट्राला तरी नक्कीच शोभणारे नाही. राज्याच्या माजी गृहमंत्र्यांच्या वाहनावर दगडफेक झाली, त्यात ते जखमीदेखील झाले. नाशिकमध्ये तर पैशाच्या वाटपावरून अनेकदा तणावाची परिस्थिती निर्माण झाली. एका उमेदवाराच्या बहिणीच्या वाहनावरही दगडफेक झाली. हा सगळा तणाव पाहता प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी ही मतदानाची संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पाडणे निवडणूक आयोगासमोर नक्कीच खूप मोठ्ठे आव्हान आहे. वातावरणातला द्वेष, विखार कोणत्याही क्षणी स्फोटक स्वरूप धारण करू शकतो. मतदारांना धमकावणे, प्रलोभन दाखविणे, दहशत निर्माण करणे वगैरे प्रकार उत्तर प्रदेश, बिहारसारख्या राज्यात तेदेखील खूप आधी होत असत; परंतु हे सगळे प्रकार आता देशाला दिशा देणाऱ्या महाराष्ट्रात आज घडू पाहत आहेत, ही नक्कीच काळजीची आणि शरमेची बाब म्हणावी लागेल. सुदैवाने आतापर्यंत तरी कोणतीही मोठी दुर्घटना घडली नाही, काही अपवाद वगळता निवडणूक प्रचार मोहीम तशी सुरळीत पार पडली; परंतु प्रचारादरम्यान पेरल्या गेलेल्या द्वेषाच्या, विखाराच्या बारूदीचा ऐन मतदानाच्या दिवशी भडका तर उडणार नाही ना, ही भीती कायम आहेच. असे काहीही होऊ न देता मतदानाची संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पाडणे ही निवडणूक आयोगासोबतच प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे.

## कटाक्ष



जयंत माईणकर
9821917163

# सुप्रिया मुख्यमंत्री व्हावी ही तो पवारांची इच्छा!

शरद पवारांनी आपली कन्या सुप्रिया पवार सुळे यांना मुख्यमंत्री पदावर बसवण्यासाठी राजकीय हालचालींना सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून शिरूर तालुक्यात एका प्रचारसभेत बोलताना महाराष्ट्राला महिला मुख्यमंत्री मिळावा, अशी इच्छा प्रदर्शित केली.

पवार म्हणाले राज्यात त्यांच्या सत्ताकाळात महिलांना ३० टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्राने घेतला. त्यानंतर हा निर्णय देशभर लागू झाला. आज ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत महिलांचा सहभाग वाढला आहे. आता महाराष्ट्राला महिला मुख्यमंत्री मिळालेली पाहण्याची माझी इच्छा आहे.

आगामी निवडणुकीनंतर येणारे सरकार बनविण्यात शरद पवारांची भूमिका महत्त्वाची असेल हा मुद्दा मी नेहमीच माझ्या लेखात आणि टी व्ही डीबेट्समध्ये मांडत असतो. इतकेच नव्हे, तर नव्या सरकारचा मुख्यमंत्री आपल्या पसंतीचा असावा किंबहुना त्या जागी आपली कन्या सुप्रियाच बसावी, असे पवारांच्या मनात असल्यास नवल वाटायला नको. आणि म्हणूनच की काय भावी मुख्यमंत्र्यांचा चेहरा देण्याच्या या रेसमध्ये राष्ट्रवादी उतरली नाही.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे समर्थक आपापल्या नेत्यांचा भावी मुख्यमंत्री म्हणून उल्लेख करतात. गृहमंत्री अमित शाह यांनी तर खुलेआम फडणवीसांना भाजपचे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार म्हणून उल्लेख केला; पण पवारांनी आपल्या पक्षाकडून कोणत्याही नावाचा उल्लेख केला नाही. अनेक नावे समोर आल्यावर पवारांनी जयंत पाटील यांचे नाव पुढे केले, पण ते तात्पुरते होते असे वाटते.

शरद पवारांची राजकीय खेळी सुरू होईल २३ नोव्हेंबरला निवडणूक निकालानंतर! ही खेळी पवार याआधी १९८६ ला खेळले होते. पंचावन्न आमदार असलेला आपला पक्ष त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन केला आणि त्यानंतर दीड वर्षात त्यांना मुख्यमंत्री करण्यात आले. आज त्यांच्या पक्षाचे लोकसभेत आठ खासदार आहेत. ही आपली शेवटची विधानसभा निवडणूक त्याचबरोबर २०२६ नंतर पुन्हा राज्यसभेत परतणार नाही याची घोषणा करून पवारांनी त्यांच्या मतदारांना भावनिक साद घातली आहेच. आज त्यांच्या पक्षाचे ८७ उमेदवार रिंगणात आहेत. लोकसभेत केवळ १० जागा लढून त्यांनी आठ जागा मिळविल्या तशाच प्रकारचे घवघवीत यश त्यांच्या पक्षाला अपेक्षित आहे. पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे साठ ते सत्तर आमदार असतील अशी अपेक्षा! आणि नव्याने निवडून आलेल्या आमदारांच्या भरवशावर पवार काँग्रेसची वाट धरू शकतात, कारण त्यामुळे लोकसभेत काँग्रेसची सदस्यसंख्या १०७ होईलच. शिवाय १०३ जागी लढणाऱ्या काँग्रेसला ७५ च्या वर जागा मिळण्याची अपेक्षा आहे. केवळ हे दोनच पक्ष १४५ च्या आसपास पोचतील असे वाटते. त्याचबरोबर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदारसुद्धा शरद पवारांच्या छावणीत दाखल होऊ शकतात. असे झाले तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची संख्या काँग्रेसपेक्षा जास्त होऊ शकते.

राजकारणातील नेहरू- गांधी कुटुंबाची वंशपरंपरा यावर कोणीही कितीही टीका केली तरीही या देशाचे राजकारण पारिवारिक पक्षांवर आधारित आहे. बहुतेक सगळे पक्ष हे पारिवारिक मालमत्ता असतात. याला अपवाद म्हणजे नामशेष होत चाललेले कम्युनिस्ट आणि भाजप! अर्थात भाजपमध्येही वंशपरंपरा आहे. मात्र, ती दुसऱ्या फळीतील नेतृत्वात आहे. सर्वोच्च नेतृत्व आत्तापर्यंत अविवाहित असल्याने त्यांची वंशपरंपरा सुरू होण्याचा प्रश्नच नाही. दुसरी गोष्ट भाजपच्या डोक्यावर संघ परिवार आहे.

नेहरू- गांधी कुटुंबाने देशाला तीन पंतप्रधान आतापर्यंत दिले, तर चौथ्या व्यक्तीने (सोनिया गांधी) किंगमेकर किंवा पंतप्रधान मेकरची भूमिका निभावली. आज त्या वंशाचे राहुल गांधी चौथे पंतप्रधान बनण्याची वाट पाहत आहेत. काश्मीरपासून केरळपर्यंत प्रत्येक राज्यात राजकीय परिवार किंवा पारिवारिक पक्ष आहेत.

नेहरू- गांधी परिवाराच्याप्रमाणे अब्दुल्ला परिवाराने तीन मुख्यमंत्री दिले, तर देवीलाल यांच्या चौथ्या पिढीचे प्रतिनिधी दुष्यंत आतापर्यंत हरियाणाचे उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्रात शंकरराव आणि अशोक चव्हाण हे पिता- पुत्र मुख्यमंत्री बनले. आतापर्यंत राज्याला चार उपमुख्यमंत्री देणारे माजी मुख्यमंत्री शरद पवार आज त्याच मांदियाळीत आपल्या कन्येचा समावेश करण्यासाठी उत्सुक आहेत. चार उपमुख्यमंत्री देताना पवारांनी जाणीवपूर्वक अजित पवारांना संधी असूनही मुख्यमंत्री पद दिले नाही ते आपल्या मुलीसाठी अडथळा नको म्हणूनच!

आणि आज तीच संधी ते घेत आहेत! महाराष्ट्राची पहिली महिला मुख्यमंत्री करण्यासाठी! सुप्रियाच्या रूपाने!

तूर्तास इतकेच!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## भाष्य



न.मा.जोशी
8805948951

# 'बटेंगे तो कटेंगे?', 'रोटी, बेटी, माटी'! आज होणार फैसला!

महाराष्ट्र आणि झारखंडचे भविष्य ठरवणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुराळा, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी थंडावल्या आहेत. बुधवार, २० नोव्हेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यात झारखंडच्या उर्वरित ३८ जागांवर आणि महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा जागांवर मतदान होणार आहे. आणि या मतदानातच राज्याबाहेरील उपऱ्यांनी दिलेल्या 'बटेंगे तो कटेंगे'चा फैसलाही होणार आहे. देशाचे प्रमुख या नात्याने ज्यांच्यावर नैतिक मूल्य, आदर्श आणि गौरवशाली परंपरा जतन करण्याचे उत्तरदायित्व आहे त्यांनी दिलेल्या विभाजनकारी सुधारित- 'एक हैं तो सेफ़ हैं'। आवृत्तीचाही निकाल लागणार आहे. झारखंडमध्ये 'वे आपकी बेटी छिनेंगे, रोटी छिनेंगे, माटी छिनेंगे', असे नारे लावले होते त्याचाही फैसला होणार.

महाराष्ट्र आणि झारखंडमधील जनता आपले पुरोगामीत्व कायम ठेवते, की सांप्रदायिकतेचे हलाहल कंठाखाली स्वीकारते हे दिसणार आहे. दोन मोठ्या राज्यांतील निवडणुकांच्या शिवाय चार राज्यांतील १४ विधानसभा जागांसाठी आणि लोकसभेच्या नांदेड जागेसाठी पोट निवडणूक होणार आहे. वायनाड लोकसभा मतदारसंघातील पोट निवडणूक १३ नोव्हेंबरला पार पडली. तिथे प्रियंका गांधींचा विजय निश्चित मानल्या जात आहे. निवडणुकांचे निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहेत.

महाराष्ट्रात मुख्य लढत सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यात आहे. महायुतीमध्ये भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश आहे, तर दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांसाठी ४,१३६ उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातील ९ कोटी ६३ लाखांहून अधिक मतदार मतदान करणार आहेत. निवडणूक आयोगाने एक लाखाहून अधिक मतदान केंद्रे उभारली आहेत आणि विस्तृत सुरक्षा व्यवस्था केली आहे. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तिघांचे भवितव्य पणाला लागले आहे.

महाराष्ट्रात दोन्ही आघाडींमध्ये निकराची लढत पाहायला मिळत आहे. महायुतीला लाडकी बहीण योजनेसह इतर लोकप्रिय योजना आणि हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरणाचा लाभ होण्याची आशा आहे. हरियाणातील अनपेक्षित विजयानंतर भाजपने 'बटेंगे तो कटेंगे' या उपऱ्यांच्या विखारी नाऱ्याला प्राधान्य दिले आहे; पण ही महाराष्ट्राची संस्कृती नाही, असे सांगत भाजपच्या मित्र पक्षांनीच या नाऱ्याला ठेंगा दाखवला.

महाविकास आघाडीला अँटी इन्कमबन्सी अर्थात सत्ताविरोधी वातावरणाकडून आशा आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही पक्ष तुटल्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना विरोधी आघाडीतील सहानुभूतीचा फायदा मिळू शकतो. आधी एकनाथ शिंदे यांनी शिवसेना, तर नंतर अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस तोडली. दोन्ही पक्षांचे भवितव्य पणास लागले आहे. आता दोन्ही पक्षांमध्ये खरी-खोटीची लढाई सुरू आहे.

झारखंडमधील ८१ पैकी ४३ जागांवर पहिल्या टप्प्यात मतदान झाले, तर उर्वरित ३८ जागांसाठी बुधवारी मतदान होणार आहे. या टप्प्यात मुख्यमंत्री हेमंत सोरेन, त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन, भाजप प्रदेशाध्यक्ष बाबुलाल मरांडी आणि माजी उपमुख्यमंत्री सुदेश महतो यांच्या नशिबाचा फैसला होणार आहे. विधानसभा अध्यक्ष रवींद्रनाथ महतो यांच्या जागेसाठीही त्याच टप्प्यात मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात ज्या ३८ जागांवर मतदान होत आहे, त्यापैकी प्रत्येकी १८ जागा उत्तर छोटानागपूर आणि संथालपरगणा विभागातील आहेत, तर दोन जागा उत्तर छोटानागपूरमधील आहेत. झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस आघाडीकडे ३८ पैकी २४ जागा आहेत, तर भाजप आघाडीला १४ जागा आहेत. राज्यात एनडीए आणि 'इंडिया' आघाडीमध्ये थेट लढत आहे. जेएमएम, काँग्रेस, आरजेडी आणि डाव्यांची आघाडी मैय्या सन्मान योजनेसह राज्य सरकारच्या लोकप्रिय कार्यक्रमांवर लढत असताना, भाजपने बांगलादेशी घुसखोरांचे संरक्षण आणि 'रोटी, बेटी, माटी' हा सर्वात मोठा मुद्दा बनवला आहे.

ज्या जागांवर पोटनिवडणूक होणार आहे त्यात उत्तर प्रदेशच्या नऊ विधानसभा जागांचा समावेश आहे. याशिवाय पंजाब आणि केरळच्या चार जागांवर मतदान होणार आहे. याशिवाय महाराष्ट्रातील नांदेड लोकसभा जागेवर पोटनिवडणूक होणार आहे. राहुल गांधी रायबरेली आणि वायनाड दोन्ही जागांवर निवडून आले होते त्यांनी रायबरेली मतदार संघ कायम ठेवल्याने वायनाडमध्ये पोट निवडणूक झाली. प्रियंका गांधी तिथे उमेदवार होत्या. १३ तारखेला मतदान झाले. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील ३७ बूथ सुरक्षित ठिकाणी स्थानांतरित करण्यात येत आहेत. केंद्रीय राखीव दल आणि राज्य शासनाचे पोलीस अशा एकूण १११ कंपन्यांचे १७ हजार पोलीस मतदानाच्या दिवशी तैनात असणार आहेत. मतदानाच्या दिवशी १३० ड्रोन आकाशातून जमिनीवरील हालचालींवर नजर ठेवणार आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी शासनाने वायुसेनेचे ५ हेलिकॉप्टर मदतीला दिले आहेत. दोनशेहून अधिक संवेदनशील मतदान पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितरित्या पोहचविण्यात येत आहे.

महिलांचा मतदानातील सहभाग वाढविण्यासाठी देशातील निवडणुकांत 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले होते. याची अंमलबजावणी म्हणून देशातील विविध राज्यांत 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्यात आलेत. याचाच एक भाग म्हणून राज्यात ४२६ 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' असणार आहेत. या मतदान केंद्रांवर अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, पोलीस या सर्वांची जबाबदारी महिलाच पार पाडणार आहेत. मतदान केंद्रांवर महिलांचा मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी ही संकल्पना राबविण्यात येत असल्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटलेय.

राज्यात सर्वाधिक ४५ 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' हे नाशिक जिल्ह्यात असणार आहेत. जळगावमध्ये ३०, गोंदिया जिल्ह्यात ३२, सोलापूर जिल्ह्यात २९, मुंबई उपनगरमध्ये २६, पुणे जिल्ह्यात २१, ठाणे जिल्ह्यात १८, सातारा जिल्ह्यात १७, औरंगाबाद जिल्ह्यात १३, नागपूर जिल्ह्यात १३, अहमदनगर जिल्ह्यात १२, मुंबई शहरात १२, कोल्हापूर जिल्ह्यात १०, चंद्रपूर, नांदेड, रायगड आणि वर्धा जिल्ह्यात ९, अमरावती, बीड, सांगली, भंडारा, परभणी या जिल्ह्यांत ८, तर बुलढाणा, यवतमाळ जिल्ह्यांत ७, अकोला, जालना, रत्नागिरी, लातूर आणि पालघर जिल्ह्यांत ६, धुळे जिल्ह्यात ५, नंदुरबार, उस्मानाबाद या ठिकाणी ४, वाशिम, सिंधुदुर्ग, गडचिरोली आणि हिंगोली या ठिकाणी ३ महिला नियंत्रित मतदान केंद्रे स्थापित करण्यात आलीत.

राज्यातील मतदार, मतदान केंद्रांची संख्या- राज्यातील मतदारांची आकडेवारी पाहता पुरुष मतदार ४.९७ कोटी, ४.६६ कोटी महिला मतदार आहेत, तर महाराष्ट्रात १.८५ कोटी तरुण मतदार म्हणजेच २० ते २९ वयोगटातील मतदार आहेत, तसेच २०.९३ लाख मतदार हे पहिल्यांदाच यावेळी मतदान करतील. राज्यात एकूण १००१८६ मतदार केंद्र असतील. राज्यातील ५२७८९ ठिकाणी ही मतदान केंद्र असतील. यातील शहरी भागात ४२,६०४, तर ग्रामीण भागात ५७५८२ मतदान केंद्र असतील. महिला संचालित३८८ मतदान केंद्र असतील, तर ५३० आदर्श मतदान केंद्र असतील.

- 'मै किधर जाऊ होता नही फैसला'... अशी अनेकांची अवस्था असली, तरी राज्यांच्या व देशाच्या भल्यासाठी फैसला करावाच लागणार आहे, एवढे मात्र खरे.

(लेखक हे राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## अवकाश



प्रा. सुरेश चोपणे
9822364473
खगोल अभ्यासक, अध्यक्ष- स्काय वॉच ग्रूप
(सदस्य, इंडियन सायन्स काँग्रेस, मराठी विज्ञान परिषद), चंद्रपूर

# लघुग्रहांमुळे पृथ्वीला धोका!

आकाशात पाहताना दररोज कुठेतरी उल्का (Meteors) पडताना दिसतात; परंतु कधी कधी आपल्याला फायरबॉल उल्का पडताना दिसतात. ह्या उल्का तितक्या धोकादायक नसतात. त्या खाली पडताना वातावरणाच्या घर्षणाने जळून राख होऊन जमिनीवर पडतात; परंतु कित्येक मीटर किंवा किमी आकाराच्या उल्का मात्र पृथ्वीवर पडतात. चंद्र, मंगळ आणि बुध या ग्रहांकडे पाहताना आपल्याला हजारो खड्डे दिसतात. ह्यातील बहुदा विवरे हे उल्काघातीच आहेत. निश्चित अशाच मोठ्या उल्का पृथ्वीवरसुद्धा पडल्या होत्या. उल्कावर्षावात पडणाऱ्या लहान खडकांना उल्का (Meteorites) म्हणतात, तर काही शेकडो मीटर आणि काही किमी व्यासाच्या मोठ्या खडकांना अशनी/लघुग्रह (Asteroid) म्हणतात. गुरू आणि मंगळ ग्रहांच्या मध्ये लघू ग्रहांचा पट्टा ( Asteroid belt) असून यात लहान- मोठ्या अब्जावधी अशनी/लघुग्रह सूर्याचे भ्रमण करीत असतात. काही लघुग्रह भटकून गुरू, मंगळ, आणि पृथ्वीच्या कक्षेतसुद्धा भ्रमण करीत असतात. अशा भटकणाऱ्या मोठ्या अशनी हजारोंच्या नव्हे, तर लाखोंच्या संख्येने आहेत. भूतकाळात अशा अनेक अशनी पृथ्वीवर पडल्या आहेत आणि भविष्यात पडणारसुद्धा आहेत. प्रश्न असा, की त्या उल्कांमुळे पृथ्वीला आणि मानवाला धोका संभवू शकतो का आणि आपण आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अशा विनाशकारी अशनीपासून वाचू शकतो काय?

लघुग्रहांचे प्रकार- सूर्यमालेचा जन्म झाला तेव्हाच अगणित उल्कांचा एक पट्टा गुरू आणि मंगळ ग्रहाच्या मध्ये तयार झाला असे मानतात, किंवा बहुदा एखादा मोठा ग्रहसुद्धा इथे असेल आणि गुरूच्या प्रचंड गुरुत्वामुळे तो विस्फोट होऊन त्याचे तुकडेसुद्धा झाले असू शकतात. तेव्हापासून या उल्का इथे सूर्य प्रदक्षिणा करीत



आहेत आणि अनेकदा तिथून भटकून त्या मंगळ, चंद्र आणि पृथ्वीकडे येत आहेत. अशनी या आकारानुसार लहान, मध्यम आणि मोठ्या अशा प्रकारात मोडत असल्या, तरी त्या सर्व धोकादायक श्रेणीत नसतात. पृथ्वीच्या जवळून जाणाऱ्या (NEO) अशनी या धोकादायक (PHA) मानल्या जातात. यांचा आकार ४०० फुटांपेक्षा मोठा असून त्या ७ ते ८ मिलीयन किमी अंतरावरून जात असतात. या अशनी पडल्या, तर पृथ्वीवर प्रचंड नुकसान होण्याची भीती असते. महाराष्ट्रात बुलढाणा जिल्ह्यात लोणार येथे ५०००० वर्षांपूर्वी अशीच मोठी अशनी पडली होती. धोकादायक प्रकारच्या अवकाशीय वस्तू पुढील प्रमाणे आहेत - १) पृथ्वी जवळून जाणारे धूमकेतू २) ईटीरास प्रकारातील उल्का ज्या पृथ्वीच्या कक्षेत भटकत आहेत. ३) अटेन्स अशनी ज्या पृथ्वीची कक्षा भेदून पुढे जातात. ४) अपोलोस ज्या पृथ्वीची कक्षा भेदून जातात अशा अशनी ५) आरमोरस उल्का ह्या जास्त धोकादायक असतात, कारण त्या पृथ्वीच्या जवळून पृथ्वी आणि मंगळाच्या कक्षा भेदतात. ६) पी.एच.ए.(PHA) ह्या धोकादायक अशनी ज्याची कक्षा पृथ्वीपासून ७ कोटी किमीच्या अंतरावरून जातात .७) लघुग्रहाच्या पट्ट्यातील अशनी ज्या गुरू ग्रहाची कक्षा शेअर करतात त्यांना ट्रोजन अशनी म्हणतात. आजतागायत अशा १ किमी ते २०० किमी आकाराच्या १०००० अशनी शोधल्या गेल्या आहेत.

पूर्वी पडलेल्या उल्का - ५० ते १०० मीटर व्यासाच्या उल्का दर १००० वर्षांनी, तर लहान ४० टन उल्का दररोज पृथ्वीवर पडतात, असा अंदाज आहे. आजतागायत पृथ्वीवर खात्रीलायक १९४ अधिक उल्काघाती विवरे आढळली आहेत. समुद्रात पडलेल्या अशा पुन्हा इतक्याच उल्का राहू शकतात. आज जगातील प्रमुख मोठ्या उल्का विवरात महाराष्ट्रातील लोणार, राजस्थानमधील रामगढ विवर, अमेरिकेतील बारींगर विवर, किंबरले येथील वोल्फ क्रीक विवर, व्रेडफोर्ट विवर, मानिघन विवर, चीक्गुलब विवर, सडबरी विवर, पोपीगल विवर, नोरला विवर, नॉर्डलिंगर विवर, इ. अनेक विवरे आहेत.

सध्या किती उल्कांचा पृथ्वीला धोका- अमेरिकेच्या नासाने २०23 पर्यंत एकूण ३१००० धोकादायक श्रेणीतील लघुग्रहांपैकी २३०० धोकादायक मानल्या आहेत; परंतु पुढील काही वर्षांत ह्यातील कोणतीही अशनी पृथ्वीवर पडण्याची शक्यता नाही. सध्या अशा धोकादायक लाघुग्रहात १) बेन्नू २) २९०७५ (1950 DA) ३) 2023 TL4 ४) 2007 FT3 ५)1979XB ६)99942Apophis ७)2007 FT3 ही १ किमी व्यासाची अशनी ८) Chicxulub Impactor ही १ किमी व्यासाची अशनी ९) ७४८२ (1994 pc 1) ११०० मीटर व्यासाची अशनी १०) 46610 Besixdouzener 1 किमी व्यासाची उल्का धोकादायक श्रेणीत आहेत.

उल्कांपासून कसे वाचायचे- अवकाशातील मोठ्या अशनी या आधीच मोठ्या वेधशाळेच्या माध्यमाने हेरू शकतो आणि त्या पृथ्वीजवळून जात असेल आणि पडण्याचा धोका असेल, तर मिसाईलच्या माध्यमातून ५०० मीटर आकाराच्या उल्केला आघाताद्वारे दूर ढकलता येते किंवा विस्फोट घडवून त्यांचे लहान तुकडे करता येऊ शकतात.

एखादे लहान यान विस्फोटके घेऊन त्या उल्केवर आदळून तिला नष्ट करता येते, लेझरच्या साहाय्याने उल्केवर मारा करून तिला नष्ट करता येते, अणुस्फोट करून मोठ्या लघुग्रहांना नष्ट करता येते. कधीना कधी मोठा लघुग्रह पडणार हे निश्चित; परंतु त्यामुळे सध्याच घाबरायचे कारण नाही...

## वाचक विचार मंच

आज २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राच्या पंधराव्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदान होत आहे. आपल्या देशाच्या लोकशाही राज्यव्यवस्थेत मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य असून प्रत्येक पात्र मतदार नागरिकाने या दिवशी उत्स्फुर्तपणे, मुक्तपणे व निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावणे महत्त्वाचे आहे. मतदानाच्या माध्यमातूनच लोकशाहीची प्रक्रिया सुदृढ व समृद्ध होत असते व अशा सुदृढ व सक्षम लोकशाहीमुळे देशाच्या विकासाला वेग प्राप्त होतो. त्यामुळे राज्यघटनेने दिलेल्या मतदानाच्या अधिकाराचा वापर करून विधानसभेसाठी आपण आपला सुयोग्य लोकप्रतिनिधी निवडणे गरजेचे आहे. आपले एक मत एखाद्या चांगल्या उमेदवाराच्या निवडीसाठी महत्त्वाचे ठरू शकते. त्यामुळे चला, राज्य आणि राष्ट्र उभारणीसाठी मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडू या! मतदान

### चला, मतदान करू या!



केंद्रावर गेल्यावर होणारा गोंधळ टाळण्यासाठी मतदारांनी मतदानासाठी जाताना सोबत स्वतःचे छायाचित्र असलेली अधिकृत मतदार स्लिप न विसरता घेऊन जावी. तसेच निवडणूक आयोगाने मान्य केलेल्या, निवडणूक मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक तथा टपाल कार्यालयाचे पासबुक, भारतीय पारपत्र, राज्य तथा केंद्रीय कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, दिव्यांग व्यक्ती ओळखपत्र, वाहन चालक परवाना इत्यादी पुराव्यांपैकी कोणतेही एक ओळखपत्र पुरावा म्हणून सोबत असणे गरजेचे आहे.

**-प्रदीप शंकर मोरे**
मुंबई,
मो. नं.: ९८७०७७७२७४

### देशातील वाढती कर्करोग्यांची संख्या धक्का देणारी!

देशात कर्करोग रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यातील ८ टक्के रुग्ण महाराष्ट्रात आहेत. १०० पैकी १० ते १५ जणांना आनुवंशिकतेने कर्करोग होतो तर अन्य रुग्णांना बदलत्या जीवनशैलीने आजार होतो. व्यायामाचा अभाव, प्रदूषण व पोषकमूल्य नसलेला आहार यामुळे कर्करोग होण्याची दाट शक्यता असते. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च व राष्ट्रीय कर्करोग नोंदणी प्रकल्पानुसार २०२२ मध्ये राज्यात कर्करोगाचे रुग्ण १४.६१ लाख होते. २०२५ मध्ये हेच प्रमाण १५.७ लाख होईल, असे वर्तविण्यात येत आहे. या आजारावर संशोधन होणे आवश्यक असून तंबाखू नियंत्रण कार्यक्रम वेगाने राबविणे गरजेचे आहे, कारण त्यामुळे कर्करोग होण्याची शक्यता वाढते. निरामय आयुष्यासाठी सर्वांनी सतर्क राहणे कधीही हिताचे ठरणारे आहे!

**राजू जाधव,**
मांगूर, जि. बेळगांव

## धुमस

### रात्र वैऱ्याची आहे!

मतदानाच्या आधीची रात्र
कत्ल की रात है
कोण कुणाचा काटा काढेल?
ये अंदर की बात है

कोण आपला? कोण परका?
समझ नहीं पाओगे
राजकारणात प्रामाणिकता?
ढुंढते रह जाओगे

ज्यांना घेतले पक्षात
वो कहाँ सच्चे है?
कलंकितांसोबत का राहता?
क्यों कि दाग अच्छे है

एवढ्या केल्या उचापती
खुब नचाए बंदर
पण निकालानंतर मात्र
जो जीता वहीं सिकंदर

**ॲड. अनंत खेळकर**, अकोला

## गुल्लेर



नरेंद्र इंगळे
9561226572

# भुला आता

'परधानजी.. झोपले काय?'

'नाई नाई महाराज.. दरबारात झोपायले मी काय आमदार आहो?'

'बरं इलेक्शनचं वारं काय म्हनते? लाडक्या बहिनी खुष आहेत की नाही?'

'बहिनी खुष आहेत; पन सगळे भाऊ नाराज आहेत.'

'कशामुळे नाराज आहेत?'

'साधी गोष्ट आहे.. बहिनीले दीड हजार मयना सुरु केला अन् भावाले तितूर भेटलं नाही.. रिचार्ज माराले पैसे नाहीत.'

'आम्ही मुद्दाम लाडक्या भावाले पैसे वाटले नाहीत. काहून की फुकटचा पैसा हाती आला म्हनजे जवान पोरं दुसराच रिचार्ज मारतात.. बारमंधी जाऊन बसतात. जवान पिढी बरबाद होते.'

'सगळेच त्यातले नाहीत महाराज..'

'तुमाले ठाऊक नाही. या प्रचाराच्या धुमाळीत अनेक जवान पोराईले शौक लागला. फुकटची भेटल्यावर ते काय हयगय करतात.. आम्ही लाईट-लाईट घेतो; पन पोराईचं कंट्रोल राह्यत नाही.'

'तुमचं धोरन बाजुले ठेवा पन जवान पोरं नाराज आहेत.'

'बरं शेतकरी काय म्हनतात?'

'शेतकरी ठनान बोंबलून राह्यला तुमच्या नावानं.. कापसाले भाव नाही ना सोयाबीनले भाव नाही. कास्तकार बिचारा दिवसा उनात सोयाबीन वाळू घालते अन् रात्री घरात नेते..'

'इलेक्शन झाल्यावर भाव वाढवून देऊ.'

'त्यासाठी आपलं सरकार डबल आलं पाह्यजे ना.. तिकडे उबाठा जोर मारुन राह्यला.. दिल्लीचे दोघं बहिन-भाऊ माहोल करून राह्यले.'

'कितीही माहोल करु द्या.. लाडक्या बहिनी निवडून देतात आपल्याले.'

'मंग तुम्ही भरमात आहा महाराज.. आता बहिनी उलटल्या.. काहून की महागाईच तेवढी वाढली.. किराना वाढला.. मेडीकल वाढलं.. आपल्या सरकारनं संडासात जायले जीएसटी लावली.'

'आम्ही त्या मोठमोठ्या कारखानदाराचे कर्ज माफ केले म्हनून इकडे भाववाढ झाली.'

'तेच चुकलं तुमचं.. जनता सरकार निवडून देते. एकटा अदानी निवडून देत नाही.. आता कर्माचे फळं भोगत राहा.. डबल आपल्याले काही म्हनू नका.'



पुण्यातील गणेश कला क्रीडा मंदिरातील निवडणुकीचे साहित्य मतदान केंद्रावर घेऊन जाताना निवडणूक अधिकारी. (मंदार टण्णू)

## वेचक

### प्रेमसंबंधास नकार दिल्याने तरुणीची बदनामी

**पुणे :** प्रेमसंबंध ठेवण्यास नकार दिल्याने तरुणीच्या नावे समाज माध्यमात बनावट खाते उघडून बदनामी केल्याप्रकरणी एकाविरुद्ध



कोथरूड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका तरुणीने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुणी कोथरूड भागात राहायला आहे. आरोपी तरुणीचा मित्र आहे. तरुणीने त्याच्याबरोबर असलेले प्रेमसंबंध तोडले. प्रेमसंबंध तोडल्याने आरोपी तिच्यावर चिडला होता. त्याने तरुणीच्या नावे समाज माध्यमात बनावट नावाने खाते उघडले. समाज माध्यमातील खात्यावर तरुणी आणि तिच्या आईच्या नावे बदनामीकारक मजकूर प्रसारित केला. तसेच त्याने अश्लील छायाचित्रे प्रसारित केली. तरुणीच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर तिने त्याच्याकडे विचारणा केली. आरोपीने तरुणीला शिवीगाळ केली. पोलिसांकडे तक्रार दिली तर तुला जीवे मारू, अशी धमकी त्याने दिली. त्यामुळे घाबरलेल्या तरुणीने पोलिसांकडे तक्रार दिली. तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विक्रमसिंह कदम तपास करत आहेत.

### पत्नीवर पतीकडून धारदार ब्लेडने हल्ला

**पुणे :** कौटुंबिक वादातून ३५ वर्षीय एक महिला पतीपासून मागील काही दिवसांपासून विभक्त राहत होती. त्यामुळे पती बाहेरून दारू



पिऊन पत्नीकडे जात असून माझ्यासोबत राहा अशी बळजबरी केली. त्यामुळे महिलेने त्यास विरोध केला असता त्याचा राग पतीला येऊन त्याने चिडून पत्नीला शिवीगाळ करून शर्टच्या खिशातील धारदार ब्लेड बाहेर काढून पत्नीच्या शरीरावर वार केला. तिला जखमी करून पसार झाला आहे. या घटनेत रेखा संतोष चौधरी ही महिला जखमी झाली असून तिचा पती सतीश संतोष चौधरी याच्यावर सिंहगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गुंतवणुकीचे आमिष दाखवून ऑनलाइन गंडा

**पुणे :** शेअर मार्केटमध्ये ट्रेडिंगसाठी गुंतवणूक केल्यास कमी कलावधीत चांगल्याप्रकारे परतावा मिळेल असे आमिष दाखवून एका



तरुणीची अज्ञात आरोपींनी ऑनलाइन तब्बल १७ लाख ६८ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी आदिती धनंजय अवसरीकर या तरुणीने व्हॉटसअ‍ॅप ग्रुप ५५० युबीएस इन्व्हेसटमेंट लर्निंग एक्सचेंज या ग्रुपचे अ‍ॅडमीन व मार्गदर्शक व विविध मोबाईल क्रमांक वापरकर्ते, वेगवेगळया बँकाचे खातेधारक यांचे विरोधात तक्रार दाखल केली आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदरचा प्रकार नुकताच  घडला आहे. अनोळखी आरोपींनी तरुणीशी संपर्क करून तिला शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला. गुंतवणूक केल्यास त्यावर कमी कालावधीत परतावा मिळेल असे देखील सांगितले. तिला एका व्हॉटसअ‍ॅप ग्रुपमध्ये सामावून घेऊन संगनमताने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी युबीएस नावाचे अ‍ॅप प्ले स्टोअरवरून डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यात अकाऊंट तयार करायला सांगून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याच्या माध्यमातून थोडीशी रक्कम देऊन तिचा विश्वास संपादन केला. आरोपींनी दिलेल्य विविध बँक खाते क्रमांकावर रक्कम ट्रान्सफर करण्यास सांगून त्याबदल्यात कोणताही परतावा दिला नाही तसेच तिची मूळ रक्कमही परत न करता तिची फसवणूक केली आहे. याबाबत शिवाजीनगर पोलीस पुढील तपास करत आहे.

### प्रसिद्ध गायक मुकुंद फणसळकर यांचे निधन

**पुणे :** 'नक्षत्रांचे देणे' कार्यक्रमाद्वारे घराघरात पोहोचलेले प्रसिद्ध गायक मुकुंद फणसळकर (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने खासगी



रुग्णालयात मंगळवारी निधन झाले. फणसळकर यांचा 'स्मरणयात्रा' हा सुगम संगीताची वाटचाल उलगडणारा कार्यक्रम जागतिक मराठी परिषदेमध्ये गाजला होता. तसेच झी टीव्हीच्या 'सारेगमप' कार्यक्रमाचे ते पहिले विजेते ठरले होते. सुरेल गायकीने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या फणसळकर यांचे पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी कौतुक केले होते. इतकेच नव्हे, तर पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या 'भावसरगम'च्या अनेक कार्यक्रमांमध्ये फणसळकर आणि किशोर कुलकर्णी यांचा सहभाग असायचा. गीतगायन करताना काव्याला न्याय देणारे अशी त्यांची ख्याती होती. कविवर्य ग्रेस यांच्या कवितांवर आधारित 'साजणवेळ' कार्यक्रमामध्ये त्यांचा सहभाग होता. स्वरानंद प्रतिष्ठानच्या वतीने मुकुंद फणसळकर यांना माणिक वर्मा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. 'एक होता विदूषक' आणि 'दोघी' चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायनही केले होते.

# विधानसभा निवडणुकीच्या आनुषंगाने पोलीस प्रशासन सज्ज

## शहरात ६०० पोलीस अधिकारी, ६८०० अंमलदार, १७५० होमगार्ड यांची नजर

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

विधानसभा निवडणुकीच्या आनुषंगाने पुणे पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. तब्बल ६०० पोलीस अधिकारी, ६ हजार ८०० पोलीस अंमलदार, १ हजार ७५० होमगार्डसह सुरक्षा यंत्रणेच्या विविध पथकाच्या १७ कंपन्या मतदानादिवशी सज्ज ठेवल्या जाणार आहेत. मतदान कक्ष बंदोबस्त, संवेदनशील मतदारसंघातील नियोजन, बोगस मतदान रोखण्यासाठी प्लॅनिंग, पोलीस अधिकाऱ्यांचे विशेष भरारी पथक, स्थानिक पोलीस ते विविध पथके दक्ष ठेवली जाणार आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे.

विधानसभा मतदारसंघासाठी आज (दि. २०) मतदान पार पडणार आहे. प्रत्येक बुथवर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पोलीस कर्मचाऱ्यांसह होमगार्डची नियुक्ती केली जाणार आहे. त्याशिवाय संवेदनशील बुथ ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त नेमले जाणार आहे. संबंधित ठिकाणी मायक्रो ऑब्झरर्व्हर लक्ष देणार असून बुथच्या परिसराची व्हीडिओ चित्रीकरण केले जाणार आहे. मतदान सुरू असलेल्या संवेदनशील असलेल्या इमारतीत पोलिसांच्या मायक्रो प्लॅनिंगमध्ये असून, इन्स्टंट रिस्पॉन्स टीमही तैनात केली जाणार आहे. त्याचा फायदा मतदान प्रक्रिया सुरू असताना एखादी अनुचित घटना घडल्यास रोखण्यास मदत होणार आहे. अवघ्या पाच ते दहा मिनिटांत हे पथक घटनास्थळी दाखल होऊन कारवाईवर भर देणार आहे.

आचारसंहिता लागू झाल्यापासून पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई प्रभावीपणे केली आहे. तब्बल १ हजार ७०० हून अधिक आरोपींविरूद्ध कारवाई केली आहे.

परवानाधारकांकडून शस्त्रे जमा केली असून, बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्यांवरही कारवाई केली आहे. दरम्यान, शहरातील विविध भागात रात्री-अपरात्री टवाळगिरी करणारे तरुण, मद्यपीविरूद्ध गुन्हे शाखेकडून कारवाई केली जात आहे. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, गुन्हे शाखेचे अपर आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्यासह प्रत्येक झोनचे पोलीस उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पोलिसांकडून मतदान शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांनी प्राधान्य दिले आहे.



### पुण्यातील पोलीस बंदोबस्त

डीसीपी-११, एसीपी- २२, पोलीस निरीक्षक-६४, एपीआय/पीएसआय -३११, पोलीस अंमलदार-५ हजार २५५, होमगार्ड- १ हजार ८७०, विविध सुरक्षा यंत्रणेच्या कंपन्या- १७ तैनात आहेत. शहरातील ७१६ इमारतींमध्ये ३ हजार ३३१ बूथ आहेत, तर ५८ इमारतीमध्ये १० पेक्षा जास्त बूथ आहेत. त्यापैकी १ संवेदनशील बूथ आहे. तर ७४ पोलीस संवेदनशील इमारती आहेत. हे सर्व १३८ सेक्टरमध्ये विभागणी केली आहे. तसेच दोन ते तीन मिनिटांत पेट्रोलिंग व्हॅन पोहोचू शकते असे नियोजन केले आहे. गुन्हे शाखा ४० टीम कार्यरत असून, त्यामध्ये ३०० कर्मचारी तैनात आहेत. क्यूआरटी आणि घातपात पथके प्रत्येकी ६ पथक कार्यरत आहेत.

**जिल्ह्यातही कडेकोट पोलीस तैनात :** पुणे - जिल्ह्यातील ग्रामीण भागातही मतदानाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. अशी माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली आहे. बंदोबस्तात एक पोलीस अधीक्षक, दोन अपर पोलीस अधीक्षक, ९ उपविभागीय पोलीस अधिकारी, ३५ पोलीस निरीक्षक, २८७ पोलीस उपनिरीक्षक, ३ हजार २४६  पोलीस अंमलदार, २ हजार ६०० होमगार्ड, केंद्रीय दलाच्या ११ कंपनी, राज्य राखीव पोलीस दलाची एक कंपनी तैनात केली आहे.

**नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा :** मतदान प्रक्रीया शांततेत, निर्विघ्न, भयमुक्त वातावरणात पार पडावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पुणे ग्रामीण पोलीस दल सज्ज आहे.  प्रामुख्याने जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांचा व स्ट्रॉंग रूमचे सुरक्षेचा आढावा विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्यासह पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी घेतला आहे. मतदान केंद्र परिसरासह ग्रामीण हद्दीत गस्त करीता बंदोबस्त नेमली आहे. नागरीकांनी निर्भिडपणे, भयमुक्त होऊन मतदानासाठी बाहेर पडून मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

#### वातावरण बदलण्याचे संकेत असून पडणार गारठा

# राज्यात वाढणार हुडहुडी

◆ **पुणे(प्रतिनिधी) :**



येत्या तीन ते चार दिवसांत राज्यातील किमान तापमानाचा पारा २ ते ४ अंश सेल्सिअसने घटणार असून, यामुळे हुडहुडी वाढणार आहे. मंगळवारी नगर येथे सर्वात कमी ११.६ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदविण्यात आले.

राज्यात थंडीचे आगमन झाले असून, पारा आता १२ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आला आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यात वाढ झाल्याने वायव्य, उत्तर, मध्य, पश्चिम तसेच पूर्व भारतात कमाल तसेच किमान तापमानात घट झाली आहे. उद्रारेकडील राज्यात थंडीची हुडहुडी वाढली असून, काही भागात धुक्याचे साम्राज्य पसरले आहे. पंजाब, हरियाणा, दिल्ली, चंदीगड या राज्यात रात्री तसेच पहाटे धुक्याचे प्रमाण अधिक असल्याने वाहतुकीवर परिणाम जाणवत आहे. गेले काही दिवस दिल्लीतील किमान तापमानात घट होत असून, मंगळवारी सर्वात कमी ९.१ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान येथे नोंदविण्यात आले.

राज्यात उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील भागात किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका अधिक आहे, तर कोकणात अद्यापही कडाक्याची थंडी पडलेली नाही.

**मंगळवारी नोंदविण्यात आलेले किमान तापमान**

अंश सेल्सिअसमध्ये औरंगाबाद १४.४, डहाणू १९.५, जळगाव १३.८, जेऊर १२, कोल्हापूर १७.३, महाबळेश्वर १३.८, मालेगाव १५, नाशिक १२.७, उस्मानाबाद १५.४, परभणी १४.६, रत्नागिरी २०.६, सांगली १६, सातारा १४.७, सोलापूर १६.८

**दिल्लीतील हवा सर्वात खराब**

दिल्ली हवा प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून, मंगळवारी येथे वायू प्रदूषणाचा निर्देशांक ४९४ इतका नोंदविला गेला. तसेच या खालोखाल पटना, लखनऊ या शहरांचा समावेश आहे.

## दीड हजार गुन्हेगारांची झाडाझडती

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांवर वचक बसण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. मतदान प्रक्रिया शांततेत होण्यासाठी पोलिसांनी तीन दिवसांत शहर आणि उपनगरातील एक हजार ५१३ सराइतांची झाडाझडती घेऊन त्यांना नोटिसा बजाविल्या आहेत. कायदा आणि सुव्यस्थेला बाधा आणल्यास गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. तसेच  पोलिसांनी नाकाबंदी, गुन्हेगारांचे वास्तव्याचे ठिकाणी अचानक तपासणी (कोम्बिंग ऑपरेशन) केली आहे.

## शहरातील कचरा समस्येने उग्र रूप केले धारण



◆ **पुणे(प्रतिनिधी) :**

'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे' या प्रमाणे पुण्याच्या शेजारी असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील नागरिकांकडून रस्त्यांवर कचरा गुपचूप टाकला जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. तसेच रस्त्याच्या कडेला कचरा टाकणारे हे नागरिक सुशिक्षित असून अशा पद्धतीने रस्त्यावर कचरा टाकला जाऊ नये, असे आवाहन करूनही याकडे वारंवार दुर्लक्ष केले जाते.

शहरातील विविध भागांत तयार होणारा कचरा हा घंटागाडीच्या माध्यमातून गोळा केला जातो. दररोज सकाळच्या वेळेत हा कचरा गोळा केला जातो. त्यामुळे पहाटे फिरायला बाहेर पडलेले नागरिक आपल्याबरोबर कचरा आणत तो जागा मिळेल अशा कोणत्याही ठिकाणी फेकतात. यासाठी महापालिकेच्या घनकचरा विभागाने रात्री नऊनंतर कचरा गोळा करणारी घंटागाडी सुरू केली पाहिजे. तसेच कोणाकडे काही कारणास्तव जास्त प्रमाणात कचरा असल्यास त्यासाठी पालिकेने वेगळी स्वतंत्र गाडी पाठवावी. यासाठी काही प्रमाणात शुल्क घेण्यास कोणाचीही हरकत नाही. वारंवार असे दिसून आलेले आहे की, महापालिकेच्या घंटागाडीचे कर्मचारी कचरा संकलन व्यवस्थित आणि योग्य पद्धतीने करत नाही. तसेच अनेकदा कचरा गोळा करणाऱ्या गाडीमध्ये क्षमतेपेक्षा अधिकच भरला असतो.

**कचऱ्याचे ढीग 'जैसे थे'**

कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेने याकडे गांभीर्याने पाहत काही भागांत संध्याकाळी आणि रात्रीच्या वेळेत कचरा गाडी पाठविली पाहिजे. गेले अनेक वर्षे हा प्रश्न सुटलेला नाही, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पावले उचलली पाहिजे अशी काही नागरिकांची मागणी आहे. तसेच काही प्रमाणात जनजागृती करण्यात पालिका प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोपही काही नागरिक करत आहे.

# पीएच. डी. प्रबंधाला मिळणार पुरस्कार

◆ **पुणे(प्रतिनिधी) :**

यूजीसीने या संदर्भातील मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'पीएच.डी. एक्सलन्स सायटेशन्स' हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच गुणवत्तापूर्ण पीएच.डी. संशोधकांची दखल घेणे हा या पुरस्काराचा उद्देश आहे. त्या अंतर्गत दरवर्षी विविध शाखांतील दहा पीएच.डी. प्रबंधांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार असून, १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीतील प्रबंध विचारात घेतले जाणार आहेत.

त्यानुसार अभियांत्रिकी, विज्ञान, समाजशास्त्र, भाषा अशा विद्याशाखांतील संशोधन प्रबंध पुरस्कारासाठी निवडले जाणार आहेत. संशोधनाचा अत्युच्च दर्जा दर्शवत ज्ञान, संशोधन



पद्धती, स्पष्टता, परिणाम आणि परिणामकारक सादरीकरण हे घटक विचारात घेतले जाणार आहेत. पुरस्कार निवडीसाठीची प्रक्रिया दोन टप्प्यात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर आणि यूजीसी स्तरावर निवड समिती असणार आहे.

पीएच.डी. प्रबंधाला पुरस्कार देण्याच्या उपक्रमातून देशातील विद्यापीठांमध्ये केल्या जाणाऱ्या संशोधनाला आणि विविध विद्याशाखांतील संशोधकांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे. प्रत्येक विद्यापीठाला १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या वर्षभराच्या कालावधीत पदवी प्रदान समारंभात पीएच.डी. प्रदान केलेले पाच विद्याशाखांतील पाच प्रबंध पुरस्कारासाठी नामांकित करता येणार आहेत. पुरस्कार प्रदान कार्यक्रम शिक्षक दिनी (५ सप्टेंबर) होणार आहे.

दरम्यान, पीएच.डी. संशोधनाला पुरस्कार देणे ही चांगली कल्पना आहे. मात्र, त्यासाठीची निवड अत्यंत काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. चांगल्या दर्जाच्या पीएच.डी. संशोधनाला पुरस्कार मिळाल्यास अन्य चांगल्या संशोधकांना प्रोत्साहन मिळेल. त्या दृष्टीने हे पाऊल सकारात्मक आहे, असे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. भूषण पटवर्धन यांनी सांगितले.

**पीएच.डी. प्रवेशांत वाढ**

यूजीसीने केलेल्या अभ्यासानुसार पीएच.डी. प्रवेशांकडील कल वाढत असल्याचे दिसून आले आहे. २०१०-११ मध्ये ७७ हजार ७९८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी.ला प्रवेश घेतला होता, तर २०१७-१८ मध्ये १ लाख ६१ हजार ४१२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामुळे आठ वर्षांमध्ये प्रवेश दुपटीने वाढले. पीएच.डी.च्या आकडेवारीचा आढावा घेतला असता विज्ञान शाखेत ३० टक्के, त्यानंतर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान शाखेत २६ टक्के, समाजशास्त्रात १२ टक्के, भारतीय भाषांमध्ये ६ टक्के, व्यवस्थापन आणि शिक्षण या शाखेत ५ टक्के, कृषीशास्त्रात ४ टक्के, वैद्यकीय शाखेत ५ टक्के, वाणिज्य शाखेत ३ टक्के आहे.

### 'ईझीचेक'ला माशेलकर फाऊंडेशनचा पुरस्कार प्रदान

**पुणे :** पुणे इंटरनॅशनल सेंटरतर्फे घेण्यात आलेल्या १२ व्या राष्ट्रीय परिषदेत सुई न टोचता ॲनिमियाचे निदान करणाऱ्या 'ईझीचेक' या उपकरणास अंजनी माशेलकर फाऊंडेशनचा 'इन्क्ल्युझिव्ह इनोव्हेशन'चा पुरस्कार देण्यात आला. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष संजय किर्लोस्कर यांच्या हस्ते 'इव्हीआयएक्स हेल्थ टेक'चे संस्थापक पार्थ प्रतीमदास महापात्रा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सन्मानचिन्ह व एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी फाऊंडेशनचे प्रमुख व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर उपस्थित होते.

#### न्यायालयात २ डिसेंबर रोजी हजर राहण्याचे आदेश

## राहुल गांधी हाजिर हो...

◆ **पुणे(प्रतिनिधी) :**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना पुण्यातील विशेष न्यायालयात हजर राहण्याचे समन्स बजाविण्यात आले आहे. गांधी यांना सोमवारी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, ते प्रचारात व्यस्त असल्याने न्यायालयात हजर राहू शकले नाहीत, असे त्यांच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले. त्यानंतर गांधी यांना २ डिसेंबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांनी दिले. लंडन येथील एका कार्यक्रमात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी राहुल गांधी यांनी अवमानकारक वक्तव्य केले होते.



त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी पुण्यातील न्यायालयात अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी गांधी यांच्याविरुद्ध दावा दाखल केला होता. यापूर्वी गांधी यांना विशेष न्यायालयात हजर राहण्याबाबत समन्स बजाविण्यात आले होते. संबंधित समन्स दिल्लीतील तीस हजारी न्यायालयाऐवजी पातियाळा येथील न्यायालयात पोहोचल्याने ते पुन्हा पुण्यातील न्यायालयात पाठविण्यात आले होते. त्यानंतर गांधी यांना पुन्हा समन्स बजाविण्यात आले. त्यानुसार गांधी यांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. संबंधित समन्स गांधी यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. याबाबतची कागदोपत्री पोहोच सात्यकी सावरकर यांचे वकील ॲड. संग्राम कोल्हटकर यांनी न्यायालयात सादर केली. समन्स मिळाल्यानंतर गांधी न्यायालयात हजर राहिले नसल्याचे ॲड. कोल्हटकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. गांधी यांच्या वतीने ॲड. मिलिंद पवार यांनी न्यायालायत अर्ज केला. गांधी प्रचारात व्यस्त असल्याने ते न्यायालयात हजर राहू शकले नाहीत.

#### 'ललितकलांच्या आस्वादाने सर्वोच्च आनंदाची होते प्राप्ती'

# संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ कारकिर्दीबद्दल खाडीलकर यांचा सन्मान

◆ **पुणे(प्रतिनिधी) :**

"जगातला सर्वोच्च आनंद ललितकलांच्या आस्वादाने मिळतो. अशा आनंदाची प्रचीती घेण्याची वृत्ती, संधी, ऊर्जा ईश्वरकृपेने मला मिळाली. यापुढेही कलानंद देणे आणि घेणे, हा प्रवास सुरू राहो, हीच प्रार्थना", असे भावपूर्ण मनोगत ज्येष्ठ गायिका विदुषी आशा खाडीलकर यांनी व्यक्त केले. 'विदुषी वीणाताई सहस्रबुद्धे यांच्या नावाने मानपत्र मिळाल्याचा विशेष आनंद वाटतो', असेही त्या म्हणाल्या.

ख्यातनाम गायिका, संगीतकार डॉ. वीणा सहस्रबुद्धे यांचे शिष्य आणि प्रसिद्ध गायक अतुल खांडेकर



यांच्या सूर महती फाऊंडेशनच्या वतीने आयोजित सूर महती महोत्सवात विदुषी आशा खाडिलकर यांना संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ कारकीर्दीबद्दल सन्मानित करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

डॉ. वीणा सहस्त्रबुद्धे यांना सांगीतिक आदरांजली वाहण्याच्या उद्देशाने आयोजित हा दोन दिवसीय महोत्सव कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न झाला. या महोत्सवादरम्यान घरोघरी जाऊन रुग्णसेवा करणारे विशाल भागवत यांचाही फाऊंडेशनच्या वतीने सन्मानपत्र प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला. फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल खांडेकर, भक्ती खांडेकर आणि ज्येष्ठ गायिका तसेच संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका अभिनेत्री निर्मला गोगटे यावेळी उपस्थित होते.

आशा खाडीलकर यांनी याप्रसंगी वीणाताई, बोडस कुटुंबीय आणि स्वतःचे नाते उलगडले. "कलेवर आत्यंतिक प्रेम करणारी संगीताची विद्यार्थिनी, एक कलासाधिका म्हणून मी वीणाताई आणि त्यांचे पती हरी सहस्रबुद्धे यांना वंदन करते. वीणाताई नात्याने माझी बहीण होती. तिचे वडील पं. शंकरराव बोडस आणि माझे वडील ही आतेमामे भावंडे होती. देशाची फाळणी झाली, तेव्हा हे कुटुंब कराची येथे होते. नंतर ते कानपूर येथे स्थायिक झाले. पण सांगलीला आमच्या घरी ते नेहमी येत तेव्हा वयाने अगदीच छोटी असलेल्या मला शंकरकाका, काशिनाथदादा आवर्जून बंदिशी शिकवत असत. मला लहानपणापासून संगीताची प्रचंड ओढ होती. छायानट, चंद्रकंस, मधुवंती रागांतील बंदिशी मला त्यांनी शिकवल्या. वीणाताई गात असत, ती 'मतवारो बादल आयो' ही रचनाही मला काशिनाथदादांनी शिकवली होती. शंकरदादांनीही अप्रतिम रचना शिकवल्या. आम्ही सतत गाण्याच्या वातावरणात असायचो. सुदैवाने लग्नाआधी आणि नंतरही मला समृद्ध आयुष्य लाभले. त्यामुळे संगीत, साहित्य, अभिनय या आवडी जपता आल्या आणि जगणे समृद्ध झाले", अशी भावना आशाताईंनी व्यक्त केली.

विदुषी निर्मला गोगटे म्हणाल्या, "सूरमहती फाऊंडेशन हे नाव अन्वर्थक आहे. वीणाताई अखंड सुरांचा विचार करत. बारा सुरांतले षड्जाचे अस्तित्व प्रत्येक सुरात प्रतीत होणं म्हणजे सुरेल असणं, वीणाताई अशा सुरेल होत्या. त्या आदर्श गुरू होत्या. त्यांचा शिष्य म्हणून अतुलने डोळस विद्या ग्रहण केली आहे. गोविंदराव टेंबे म्हणत असत, की, इतर कला शिकलात तर सौंदर्यदृष्टी येते, पण संगीत शिकलात की, वृत्तीच सौंदर्यमय होते. आद्य कीर्तनकार नारदांच्या वीणेचे नाव महती होते. संगीताचा आत्मा म्हणजे सूर, त्याची महती म्हणून सूर महती फाऊंडेशन हे नाव आहे", अशा शब्दांत त्यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

# मतदानावेळी ओळखपत्र सोबत ठेवणे गरजेचे

◆ **पुणे(प्रतिनिधी) :**

विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदारांना मतदान करताना आपले ओळखपत्र पुरावा म्हणून सोबत ठेवणे बंधनकारक आहे. यासाठी आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, वाहन परवाना अशा एकूण १२ दस्ताऐवजांपैकी कोणतेही एक निवडणूक आयोगाने ओळखपत्र म्हणून ग्राह्य घोषित केले आहे. त्यामुळे ओळखपत्र सोबत बाळगणे गरजेचे असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा लांडगे यांनी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सर्व मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मतदानाच्या दिवशी म्हणजेच आज सकाळी ६ ते मतदान संपेपर्यंतच्या कालावधीत मतदारांना मोबाईल वापरण्यास मनाई असल्याचा आदेश दिला आहे. मतदानाचे चित्रीकरण, छायांकन करून गोपनीयतेचा भंग करणे हा निवडणूकविषयक गुन्हा आहे. त्यादृष्टीने मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेमध्ये समावेश असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांना भ्रमणध्वनी वापरण्यास मुभा देण्यात आली आहे. तसेच सोमवार सायंकाळीपासून सायलेंट पिरेड सुरू झाला असून मतदान पार पडेपर्यंत टीव्ही, केबल, नेटवर्क, रेडिओ, सोशल मीडियाद्वारे मतदार तसेच निकालावर परिणाम करू शकणाऱ्या बाबी प्रदर्शित करण्यास निवडणूक आयोगाची मनाई आहे.

# परळीत लोकशाहीची 'ऐशी की तैशी'

## माधव जाधवांना भर रस्त्यावर मारहाण

## मतदारसंघात अनेक ठिकाणी राडा

## बूथ कॅप्चर, बोगस मतदान, मत केंद्र परिसरात पैसा

## जागृतीचे ढोंग करुन प्रशासन मात्र चुडीचूप

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळीत लोकशाहीची ऐशी कि तैशी झाली आहे . मतदारसंघात अनेक ठिकाणी मतदान केंद्रावर राडा , बुथ कॅप्चर, मतदारांना थेट पैसा वाटप असे लोकशाहीला काळीमा फासणारे गंभीर प्रकार घडले आहेत. बँक कॉलनी परळी येथील मतदान केंद्रास भेट देण्यास गेलेल्या ड. माधव जाधव यांना धंनजय मुंडे समर्थकांनी भर रस्त्यावर जबर मारहाण केल्याची घटना घडली आहे .असे होत असतांना प्रशासन मात्र केवळ बघ्याची भूमीका घेत होतं . जाधव यांना झालेल्या अमानूष मारहाणीने गुंड गिरी, दहशतीचे वातावरण संबंध परळी मतदारसंघात निर्माण झाले आहे . पोलिस, महसुल, निवडणूक विभाग मतदान प्रक्रिया दहशत मुक्त करण्यात अयशस्वी झाले आहे . परळी मतदारसंघात जवळपास गावां मध्ये एकच व्यक्ती बॅलेट मशीन पाशी बसुन प्रत्येकाचे





मतदान करत असल्याचा देखील गंभीर प्रकार घडल्याचे समजते आहे.

सिरसाळ्यात बोगस मतदान, बूथ कॅप्चर, मतदान केंद्र परिसरात पैसा वाटप असे गंभीर प्रकार घडले आहेत . हा प्रकार खुलेआम राजरोस सुरु होता . प्रशासन मात्र

### प्रशासनाने मतदार जागृती रॅलींचे ढोंग बंद करावे

परळी मतदारसंघात कोणतीही निवडणूक दहशतीच्या वातावरणात पार पडते असते , बूथ कॅप्चर,बोगस मतदान,दहशत ,गुंडगिरी असे प्रकार सर्रास होत आहेत या मुळे परळी मतदारसंघातील निवडणूक निवडणूक भययुक्त होत असते, प्रशासन मात्र या कडे

गांभीर्याने लक्ष देत नाही.अशा प्रकारांना आळा घालण्यात आणि भयमुक्त वातावरणात निवडणूक घेण्यात प्रशासन अयशस्वी ठरले आहे . उगाच फॉर्म्यालिटी कंप्लेंट करायाच्या म्हणून मतदार जागृती रॅली काढण्याचे ढोंग प्रशासनाने बंद करावे अशी प्रतिक्रिया लोकांमधून उमटत आहे .

# अग्निरोधक यंत्रणेसाठी निधीचा प्रस्ताव

## लक्षवेधी: डॉ.गणेश ढवळे यांचे निवेदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

३ वर्षांपूर्वी अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात आग लागुन ११ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता.अशा घटनांवर उपाययोजनेसाठी सरकारनेच आरोग्य विभागाकडून अग्निरोधक यंत्रणा उभारणीसाठी प्रस्ताव मागविले होते.परंतु ३ वर्षांपासून हे प्रस्ताव शासन दरबारी धुळखात पडुन असुन बीड जिल्ह्यातील १७ रूग्णालयात अग्निरोधक यंत्रणा उभारणीसाठी २८ कोटी रूपयांच्या अंदाजपत्रकासह निधी मागणीचे



प्रस्ताव शासनाकडे पाठवले आहेत परंतु अद्याप निधीबाबत आरोग्य विभाग आणि शासनाने आखडलेला हात सैल केला नाही त्यामुळे सरकार आणखी एखाद्या रूग्णालयातील पान २ वर...

# राज्यात भाजपा महायुतीचं सरकार

## आशावाद:आ.पंकजा मुंडेंनी व्यक्त केला विश्वास

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यभरात मी अनेक ठिकाणी प्रचार सभा घेतल्या, त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. महायुतीच्या सरकारने राबवलेल्या योजनांमुळे लोकांचा विश्वास वाढलाय, त्यामुळे राज्यात भाजपा महायुतीचे सरकार बहुमतांनी येईल असा विश्वास भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा स्टार प्रचारक आ. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला. आमची परळीची जागा रेकॉर्डब्रेक मतांनी निवडून येईल असेही त्या म्हणाल्या.

नाथरा येथे मतदानाला जाण्यापूर्वी आ. पंकजाताई मुंडे यांनी निवासस्थानी पत्रकारांशी



संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. गेल्या तीन तारखेपासून मी प्रचारात आहे. राज्यात वेगवेगळ्या क्षेत्रात सभा घेतल्या, सर्व ठिकाणी चांगला पान २ वर...

# गुंडांचा धिंगाणा, व्हीव्ही पॅटची तोडफोड

## पडसाद: धनंजय मुंडेंची कारवाईची आयोगाकडे तक्रार

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शरद पवार गटाच्या उमेदवारांनी, त्यांचे पुत्र व त्यांच्या गुंडांनी थेट दहशत आणि गुंडशाही सुरू केली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी, जवळगाव आदी गावांमध्ये लाठ्या काठ्या व दगड हातात घेऊन थेट मतदान केंद्रावरच हल्ला केला आहे. यावेळी बूथ ताब्यात घ्यायला यश न मिळाल्याने व्हीव्हीपॅट मशीन सह मतदान यंत्रांची तोडफोड करण्यात आली आहे. लाट्या काठ्या व दगड हातात घेऊन मतदान केंद्रात गुंड घुसल्याचे पाहून तेथील मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला जीव वाचवून पळ काढला.



हा जमाव इतक्यावरच थांबला नाही तर त्यांनी धनंजय मुंडे यांचे समर्थक जेष्ठ नेते तथा जिल्हा मजूर संस्थेचे अध्यक्ष बन्सी अण्णा शिरसाट यांच्या वाहनावर दगडफेक करत हल्ला केला. यावेळी दगड फेक करत शिरसाठ यांच्या गाडीची तोडफोड करण्यात आली आहे. शेकडोंच्या जमावाने केलेल्या या हल्ल्यातून बन्सी अण्णा शिरसाठ हे बालमबाल बचावले आहेत. ज्या मतदान केंद्रांवरती आपल्याला मतदान मिळणार नाही अशा प्रकारचा अंदाज येताच त्या मतदान केंद्रांवरती जाऊन हल्ले करण्याचा कार्यक्रम महाविकास आघाडीचे उमेदवार व त्यांचे समर्थक करत आहेत. घाटनांदुर येथे घातलेल्या धुडगुसानंतर तेथील सर्व मशीन निष्क्रिय झाल्या असून सध्या मतदान प्रक्रिया बंद आहे. ही घटना लोकशाहीला काळीमा फासणारी असून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत धनंजय मुंडे यांनी निवडणूक आयोगाने याचे संपूर्ण फुटेज तपासत तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. या हल्ल्यातील सर्व गुंडांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी असे धनंजय मुंडेंनी म्हटले आहे.दहशत, दादागिरी आणि गुंडशाही असे म्हणत परळीची बदनामी करणारे व प्रत्यक्षात मात्र स्वतःच शेकडोंचा जमाव, हातात लाठ्या-काठ्या घेऊन दगडफेक करत फिरत आहेत, हल्ले करत आहेत, याची निवडणूक आयोगाने व जनतेने देखील तात्काळ दखल घ्यावी व कारवाई करावी, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

# घाटनांदूर मतदान केंद्रावर गोंधळ

## पडसाद: मतदान प्रक्रियाकाही काळ बंद

घाटनांदूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील घाटनांदूर येथे काही बूथवर दुपारी १ते २ दरम्यान गोंधळ माजला व इ व्ही एम.मशीन फोडण्यात आल्या... सविस्तर व्रत्त असे कि दरम्यान दुपारी झालेल्या परळीतील रवीं माधव जाधव यांच्यावर झालेल्या मारहाणी च्या घटनेचे पदासाद

उमटले असून संतप्त झालेल्या समाजकंटाकानी येथील सोमेश्वर विद्यालयातील मतदार केंद्र क्रमांक २८०, २८१, २८३ व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मतदान केंद्र क्र.२८२या मतदान केंद्रावर संतप्त समाजकंटाकानी इव्हीएम



मशिन बैलेट पेपर मशीनची तोडफोड केल्याने व मतदान केंद्र क्र. २८१ चे केंद्र प्रमुख मुंडे यांना मारहाण करण्यात आल्याने जखमी पान २ वर...

# ट्रॉमा केअर युनिट झाले सुरु

## दिलासा: डॉ.अशोक थोरातांकडुन निवेदनाची दखल

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनुर येथील स्त्री व कुटीर रूग्णालय आणि पाटोदा ग्रामीण रूग्णालय याठिकाणी राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातामुळे ट्रॉमा केअर सेंटरची आवश्यकता असुन तातडीने सुरू करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी करत आंदोलनाचा ईशारा डॉ. अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना दिला होता.याची दखल घेत डॉ.अशोक थोरात यांनी नेकनुर आणि



पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे याबबतचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा लातुर मंडळ लातुर यांना पान २ वर...

आरोप | सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई

# परळीमध्ये लोकशाहीची हत्या?

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभेची निवडणूक ही पारदर्शकपणे, लोकशाही पद्धतीने पार पडायला पाहिजे होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकांनी मतदान करून पार पाडायला पाहिजे होता. परंतु येथील लोकप्रतिनिधींनी गुंडशाही, दडपशाही, पैशाच्या जोरावर प्रशासन आताशी धरून सर्व नियमाची पायमल्ली करत लोकशाहीची एक प्रकारे हत्याच केली आहे. हायकोर्टाच्या आदेशाचे येथील प्रशासनाने पालन केले गेले नाही. लोकप्रतिनिधींनी हुकूमशाही मार्गाने आमदार होण्यापेक्षा लोकशाही मार्गाने आमदार होऊन दाखवावे. तसेच निवडणूक आयोगाने निवडणूक न घेता इथून पुढे जसं राज्यपाल नियुक्त आमदार नियुक्त केले जातात त्याचप्रमाणे



### हायकोर्टाच्या आदेशाची पायमल्ली

नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातील १२२ बोगास मतदान झाल्याची तक्रार जनहित याचिकेद्वारे करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी होऊन निवडणूक आयोगाने न्यायालयाला शपथपत्र देऊन निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शकपणे पार पाडली जाईल असे सांगितले होते. परंतु कसल्याही उपाययोजना त्यांनी केल्या नाहीत. त्यामुळे येथील प्रशासनाने ही हायकोर्टाच्या आदेशाची एक प्रकारे पायमल्लीच केली आहे.

विधानसभेचाही आमदार घोषित करावेत. असे मत परळी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले.

परळी विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने बोगस मतदान होऊ नये यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली. आणि मतदान केंद्रावर हे कॅमेरे बंद होते. मतदान कक्षात १५ ते २० माणसं उभी होती. प्रशासनाने आम्हाला सांगितले होते. एका मतदान केंद्रावर प्रत्येक उमेदवाराचा एकच पोलिंग एजंट बसवावा. सर्व लोक मतदान केंद्राच्या शंभर मीटर अंतराच्या बाहेर ठेवण्यात येतील. मतदान बुथवर मोबाईल घेऊन जाता येणार नाही. वेब टेलीकास्ट पान २ वर...



गेवराई: मनसे उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी एक मताचा अधिकार बजावला, यावेळी दादासाहेब मस्के आदी.



परळी: नाथरा येथे उमेदवार धनंजय मुंडे, आ.पंकजा मुंडे कुटुंबासमवेत मताचा हक्क बजावताना



धारुर: हिंगणी येथे एक मताचा अधिकार पार पाडला. यावेळी सुनिल डोंगरे, राहुल डोंगरे,आकाश डोंगरे, अमोल बनसोडे,संघर्षकुमार डोंगरे आदी.



बीड: एक मताचा अधिकार पार पाडताना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे दिसत आहेत.



बीड: वरवटी येथे सामाजिक कार्यकर्ते ॲड.राजेश शिंदेंनी सहकुटुंब मताधिकार बजावला.



माजलगाव: दिंद्रुड येथे आयुष्यमान भारतचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटेंनी कुटुंबासह लोकशाहीचा अधिकारी बजावला.



बीड: विकास जोगदंड यांनी सहकुटुंब लोकशाहीतील अमूल्य मताचा अधिकार बजावला.!